सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

ग्राम विकास विभाग

# राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण




# महा आवास

त्रैमासिक


@MAHAAWAAS www.mahaawaas.com

एप्रिल ते जून २०२२

# क्षणचित्रे




स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव अंतर्गत मा. प्रधानमंत्री यांचे गरीब कल्याण सम्मेलन व मा. मुख्यमंत्री यांचा लाभार्थी संवाद कार्यक्रमा प्रसंगी मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, श्री.उद्धव ठाकरे यांचे स्वागत करतांना मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, श्री.मनु कुमार श्रीवास्तव




स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव अंतर्गत मा. प्रधानमंत्री यांचे गरीब कल्याण सम्मेलन व मा. मुख्यमंत्री यांचा लाभार्थी संवाद कार्यक्रमा प्रसंगी मा.उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, श्री. अजित पवार यांचे स्वागत करतांना मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, श्री.मनु कुमार श्रीवास्तव



स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव अंतर्गत मा. प्रधानमंत्री यांचे गरीब कल्याण सम्मेलन व मा. मुख्यमंत्री यांचा लाभार्थी संवाद कार्यक्रमा प्रसंगी मा.पालकमंत्री, मुंबई शहर, श्री.अस्लम शेख यांचे स्वागत करतांना मा. अतिरिक्त मुख्य सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग, श्री.राजेश कुमार




स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव अंतर्गत मा. प्रधानमंत्री यांचे गरीब कल्याण सम्मेलन व मा. मुख्यमंत्री यांचा लाभार्थी संवाद कार्यक्रमा प्रसंगी मा.राज्यमंत्री, ग्राम विकास व महसूल, श्री. अब्दुल सत्तार यांचे स्वागत करतांना मा.अतिरिक्त मुख्य सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग, श्री.राजेश कुमार

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

# ग्राम विकास विभाग

## संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष - ग्रामीण गृहनिर्माण यांचे कार्यालय


## महा आवास

| | |
|---|---|
| मार्गदर्शक | राजेश कुमार, भा.प्र.से.<br>अतिरिक्त मुख्य सचिव,<br>ग्राम विकास व पंचायत राज विभाग |
| मुख्य संपादक | डॉ. राजाराम दिघे,<br>संचालक,<br>राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण |
| प्रबंध संपादक | मंजिरी टकले, उपसंचालक<br>नीलेश काळे, उपसंचालक<br>संजय घोगळे, प्र. सहा. संचालक (लेखा) |
| कार्यकारी संपादक | दिनेश मोवळे, प्रशिक्षण समन्वयक |
| सहाय्यक संपादक | डॉ. संघरत्न सोनवणे<br>राम आघाव<br>परमेश्वर शेलार<br>माधुरी चौधरी |
| मुख्यपृष्ठ मांडणी व सजावट | दिनेश मोवळे<br>प्रशिक्षण समन्वयक<br>(माहिती, शिक्षण व संवाद) |
| संपादकीय पत्ता | संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-<br>ग्रामीण गृहनिर्माण यांचे कार्यालय<br>४ था मजला, दक्षिण कक्ष, सिडको भवन,<br>सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई - ४००६१४ |
| संकेत स्थळ | www.pmayg.nic.in<br>www.mahaawaas.com |
| ईमेल | directoriayruralhousing@gmail.com |
| दूरध्वनी क्रमांक | ०२२ - २७५६१८२४ |


## अनुक्रमणिका


| अ.क्र. | तपशिल | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | संपादकीय | १ |
| २ | महा आवास अभियान-ग्रामीण २०२१-२२ फलश्रुती | ३ |
| ३ | विविध उपक्रमांचा मागोवा<br>क्षमता बांधणी उपक्रम | १० |
| | संनियंत्रण व मूल्यमापन उपक्रम | १२ |
| | माहिती, शिक्षण व संवाद उपक्रम | १६ |
| | समन्वय उपक्रम | २० |
| | केंद्र व राज्य सरकार यांना ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रासंबंधित पॉलिसी इनपुट | २२ |
| ४ | ग्रामीण गृहनिर्माण योजनांचा संचित प्रगती अहवाल<br>प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण | २३ |
| | रमाई आवास योजना | २४ |
| | शबरी आवास योजना | २५ |
| | पारधी आवास योजना | २६ |
| | आदिम आवास योजना | २७ |
| | यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना | २७ |
| ५ | ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रातील नाविन्यपूर्ण उपक्रम/ यशोगाथा | २८ |
| ६ | फोटो गॅलरी | ३४ |
| ७ | मिडिया कवरेज | ३५ |


वर्ष २ रे । अंक ८ वा । एप्रिल ते जून २०२२

महा आवास हेल्पलाईन क्रमांक - १८०० २२ ०१९



**डॉ. राजाराम दिघे**
**संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष - ग्रामीण गृहनिर्माण**

महाआवास त्रैमासिकाच्या माहे एप्रिल ते जून २०२२ या अंकाच्या माध्यमातून आपणाशी संवाद साधताना मला आनंद होत आहे. या अंकामध्ये मागील तीन महिन्यामध्ये झालेल्या घडामोडींचा धांडोळा घेण्यात आलेला असून त्याचबरोबर माहे जून पर्यंतची सर्व योजनांची प्रगती, विभागनिहाय यशोगाथा, बैठका व नाविन्यपुर्ण उपक्रम यांचा सविस्तर आढावा घेण्यात आला आहे. असे असले तरी दिनांक २० नोव्हेंबर २०२१ ते ३० जून २०२२ या दरम्यान महा आवास अभियान २.० राबविण्यात आले. महा आवास १ च्या तुलनेत या अभियानात अनेक नव्या उपक्रमांना आपण चालना दिली व त्यात आपणास यश मिळाले.

महाआवास अभियान एक व दोनचा कालावधी एकत्रीत केला तर जवळपास १ वर्ष ७ महिने पेक्षा अधिक दिवस झाले आहेत. दोन्ही अभियानामध्ये अनेक अडचणींना तोंड द्यावे लागले. यामध्ये कोरोना जागतीक महामारी, ग्रामपंचायत निवडणुक आचारसंहितेमुळे तर दुसऱ्या अभियान काळामध्ये आवास प्लस प्रक्रीया मुळे अभियानाच्या गतीला मर्यादा आल्याचे दिसून येत होते. परंतु राज्यातील विविध भागधारकांच्या सक्रिय सहभागामुळे अभियान अधिक गतिमान करण्यात आपणास यश आले. राज्यातील विविध स्तरावरील अधिकारी/पदाधिकारी यांनी अभियानात आपला सक्रिय सहभाग नोंदविला. राज्याचे मा. मुख्यमंत्री, मा. उप मुख्यमंत्री, मा. मंत्री ग्राम विकास, जिल्हयांचे मा. पालकमंत्री, तसेच जिल्हा परिषद व पंचायत समिती यांचे अध्यक्ष, सभापती व सदस्य यांचाही अभियानातील सक्रिय सहभाग विविध प्रिंट व इलेक्ट्रॉनिक माध्यमातून दिसून आला.

ग्रामीण गृहनिर्माण बाबत भारत सरकारच्या अग्रक्रमातील वचनबद्धतेचा प्रथम उल्लेख जून २०१४ मध्ये राष्ट्रपतींच्या संसदेतील अभिभाषणात करण्यात आला होता, जिथे ते म्हणाले होते, **"जेव्हा देश आपल्या स्वातंत्र्याची ७५ वर्षे पूर्ण करेल, तोपर्यंत प्रत्येक कुटुंबाकडे एक पक्के घर असेल. पाणी कनेक्शन, शौचालय सुविधा, २४x७ वीज पुरवठा असलेले घर असेल"** तसेच सर्वांसाठी घरे या विषयावर मा.पंतप्रधान असे म्हणाले की, **"माझे एक स्वप्न आहे, जेव्हा भारताला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे पूर्ण होतील, तेव्हा देशातील सर्वात गरीब व्यक्तीकडे स्वतःचे पक्के घर असेल."** प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण ही नागरिकांच्या प्रतिष्ठेशी जोडलेली आहे आणि अधिकाधिक महिला, दिव्यांग भगिनी आणि बांधव, अनुसूचित जाती, अनुसूचित जनजाती, इतर मागासवर्गीय आणि अल्पसंख्याक समुदायांना घरे मिळावीत हे या योजनेचा गाभा आहे. **"घराची किल्ली सन्मानाची, आत्मविश्वासाची, निश्चित भविष्याची, नवीन ओळखीची आणि वाढत्या शक्यतांची दारे उघडते." असे प्रतीपादन मा. पंतप्रधान यांनी केले होते.**

**तर मा. अर्थमंत्री, भारत सरकार यांनी** २०१४-२०१५ चे अर्थसंकल्पीय भाषणामध्ये **"आमचे सरकार २०२२ पर्यंत सर्वांना घरे मिळावीत यासाठी प्रयत्न करण्यास वचनबद्ध आहे. या उद्देशासाठी, लोकांना, विशेषत: तरुणांना स्वतःचे घर घेण्यासाठी प्रोत्साहन देण्यासाठी गृहकर्जावर अतिरिक्त कर प्रोत्साहन देण्याचा माझा मानस आहे. कमी किमतीच्या परवडणाऱ्या गृहनिर्माणावर एक मिशन स्थापन करण्याचा प्रस्ताव देतो जो राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेत असेल. कमी किमतीच्या परवडणाऱ्या घरांच्या विकासाला प्रोत्साहन देण्यासाठी योजना विकसित केल्या जातील."**

युनायटेड नेशन्सच्या मते, असा अंदाज आहे की, २०३० पर्यंत दहा लोकांपैकी सहा लोक शहरवासी असतील आणि जगात प्रत्येकी १० दश लक्षाहून अधिक रहिवासी असलेली ४३ मेगासिटी असतील, त्यापैकी बहुतेक विकसनशील प्रदेशांमध्ये असतील. भारत शहरी आणि ग्रामीण भागातील सर्व नागरिकांना घरे उपलब्ध करून देण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे.

तसेच भारतातील रिअल इस्टेट क्षेत्र हे मजबूत फॉरवर्ड आणि बॅकवर्ड लिंकेजसह आर्थिक वाढीचे सर्वात मोठे चालक आहे. प्राथमिक क्षेत्र (कच्चा माल), उत्पादन क्षेत्र (बांधकाम साहित्य) आणि सेवा क्षेत्राला चालना देऊन घरांचा पुरवठा आणि गुणवत्ता वाढल्याने अर्थव्यवस्थेवर गुणाकार परिणाम होतो.

यावरून आपणास कळून येते की, सर्वांसाठी गृहनिर्माण - कार्यक्रम प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण (PMAY-G ) हा सरकारचा फ्लॅगशिप कार्यक्रम आहे. जसे २०२४ पर्यंत सर्वांसाठी घरे उपलब्ध करून देण्याचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी मिशन मोडवर काम करत आहे. त्यानुषंगाने आपणास सक्रिय स्वरूपात काम करणे आवश्यक आहे.

सदर अंकामध्ये महा आवास अभियान २.० अंतर्गत राबविण्यात आलेल्या उपक्रमांव्दारे ग्रामीण गृहनिर्माण योजनांमध्ये गतिमानता व गुणवत्ता प्राप्त करून देण्यात आली आहे. मागील अभियानाच्या तुलनेत या अभियानामध्ये अनेक उल्लेखनीय कामगीरी झाली आहे. यामध्ये ११,१७९ भूमीहीन लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करून देण्यात आली. तर ६९६ बहुमजली इमारती, ६८२ गृह संकूले उभारण्यात आली आहेत. प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत आवास योजनेतील एकूण ३,२०,७८९ लाभार्थ्यांच्या घरकुलांना मंजूरी देण्यात आली. तर २,२२,१७३ लाभार्थ्यांना पहिल्या हप्त्याचे वितरण करण्यात आले आहे. या महा आवास अभियान २.० मध्ये २,३३,३११ घरकुले पुर्ण करण्यात आली आहेत. लाभार्थ्यांच्या सर्व हप्त्यांचा लाभ देवून ३,०२,७७९ घरकुले आर्थीकदृष्ट्या पुर्ण करण्यात आली. मागील अभियानातील तालुका डेमो हाऊस पुर्ण करण्यात भर देण्यात आला असून यामध्ये एकूण १६९ डेमो हाऊसमध्ये कॉपशॉप सुरू करण्यात आले आहेत. तसेच ४ जिल्हा डेमो हाऊसचे काम पुर्ण झाले असून उर्वरीत काम येत्या कालावधीत पूर्ण होईल. प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण मधील लाभार्थ्यांचे आधार सीडींग व जॉबकार्ड मॅपींगचे उर्वरीत काम पुर्ण करण्यात आले आहे. तसेच राज्य योजनेतील लाभार्थ्यांच्या आधार सीडींग व जॉबकार्ड मॅपींगचे काम सुरू आहे. ग्रामीण गवंडी प्रशिक्षणामध्येही ९ हजारापेक्षा अधीक गवंडयांचे प्रशिक्षण पुर्ण करण्यात आले असून १० हजारापेक्षा अधीक गवंड्याचे असीसमेंट पुर्ण करण्यात आले आहे.

दरम्यानच्या काळामध्ये ४९,२४५ लाभार्थी मेळावे, २,३४,२९१ मंजूरीचे पत्र वितरण, १,५५,१५९ भूमीपूजन कार्यक्रम घेण्यात आले. मंजूरी दिलेल्या १,५६,७२९ लाभार्थ्यांना ७ दिवसाच्या आत पहिल्या हप्त्याचे वितरण करण्यात आले. लाभार्थ्यांना बांधकाम साहित्य अल्पदरात व नजीकच्या ठिकाणी उपलब्ध करून देण्यासाठी ७५५ घरकुल मार्ट सुरू करण्यात आले आहेत. लाभार्थ्याचे जीवनमान उंचावण्यासाठी शासकीय योजनांशी कृतीसंगम करण्यात आला आहे. तसचे नाविन्यपुर्ण उपक्रमांमध्ये राज्यात ३०८ बहुमजली गृहसंकूले उभारण्यात आली असून ५,६१८ लँड बँक व १,१५९ सँड बँक उभारण्यात आल्या. ७५,५०३ घरकुल बांधकामासाठी वाळूला पर्याय म्हणून क्रश सॅण्ड, सिमेंट ब्लॉक, फ्लाय ॲश ब्रिक्स, इंटर लॉकींग ब्रिक्स, हॉलो ब्रिक्स, इत्यादींचा वापर केला आहे. १,१४,२१८ घरकुल बांधकामामध्ये फरशी/लादी, रंगरंगोटी, किचन गार्डन/परसबाग, रेन वॉटर हार्वेस्टींग, सौर उर्जा साधने व नेट बिलींग, इ.चा वापर करण्यात आला आहे. तसेच सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांतील लाभार्थ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी विविध शासकीय योजनांशी कृतीसंगम करून २,२५,२९,९८७ लाभार्थ्यांना महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने मधून रोजगार, ६,६३,०८१ लाभार्थ्यांना स्वच्छ भारत मिशन-ग्रामीण मधून शौचालय, ५,३८,३८३ घरांना जल जीवन मिशन मधून नळाने पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, ५,८३,७७५ लाभार्थ्यांना प्रधानमंत्री उज्वला योजने मधून गॅस जोडणी, ६,१५,४१२ घरांना सौभाग्य योजने मधून विद्युत जोडणी, ८९,८३१ लाभार्थ्यांना राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती मिशन मधून उपजिवीकेच्या साधनांची उपलब्धता, ४६,४७२ महाराष्ट्र उर्जा विकास अभिकरण (महाउर्जा) उर्जेच्या बचतीसाठी, इ. शासकीय योजनांशी कृतीसंगमातून लाभ देण्यात आला.

त्याचप्रमाणे लाभार्थ्यांना ५,५६,४१८ मूलभूत नागरी सुविधा देण्यात आल्या आहेत. यामध्ये जोडरस्ते, अंतर्गत रस्ते, ड्रेनेज सिस्टीम, पथदिवे, या सारख्या सुविधांचा समावेश आहे.

मागील अंकाप्रमाणेच हा अंकही आपणास आवडेल या अपेक्षेसह व अनेक शुभेच्छांसह!

**डॉ. राजाराम दिघे**
**संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष - ग्रामीण गृहनिर्माण**

# महा आवास अभियान २.० फलश्रुती

राज्यात राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाच्या माध्यमातून केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण तसेच राज्य पुरस्कृत रमाई आवास योजना, शबरी आवास योजना, पारधी आवास योजना, आदिम आवास योजना, अटल बांधकाम कामगार आवास योजना, यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना अशा विविध ग्रामीण गृहनिर्माण योजना राबविण्यात येत असून त्यांना पूरक पंडीत दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना, अतिक्रमण नियमानुकूल करण्याची योजना अशा योजनाही राबविण्यात येत आहेत.

गत वर्षी राष्ट्रीय आवास दिनाचे औचित्य साधून राज्यात सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजना अधिक गतिमान करण्यासाठी व गुणवत्तावाढीसाठी दिनांक २० नोव्हेंबर, २०२० रोजी **'महा आवास अभियान-ग्रामीण'** चा राज्यस्तरीय शुभारंभ मा. मुख्यमंत्री, श्री. उद्धव ठाकरे यांच्या शुभहस्ते व मा. मंत्री, ग्रामविकास, श्री.हसन मुश्रीफ, मा. राज्यमंत्री, ग्रामविकास व महसूल, श्री. अब्दुल सत्तार व इतर मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. दिनांक २० नोव्हेंबर, २०२० ते ०५ जून २०२१ या कालावधीत राबविण्यात आलेल्या महा आवास अभियान-ग्रामीणमुळे विविध ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या अंमलबजावणीमध्ये आलेली गतीमानता व गुणवत्तावाढ विचारात घेता सन २०२१-२२ या वर्षामध्ये राज्यात **'महा आवास अभियान-ग्रामीण २०२१-२२'** या अभियानाचा राज्यस्तरीय शुभारंभ दिनांक २३ नोव्हेंबर, २०२१ रोजी मा. मंत्री, ग्रामविकास, श्री. हसन मुश्रीफ यांच्या शुभहस्ते व मा.राज्यमंत्री, ग्रामविकास व महसूल, श्री. अब्दुल सत्तार, मा. अतिरिक्त मुख्य सचिव, ग्रामविकास व पंचायत राज विभाग, श्री. राजेश कुमार, संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, डॉ.राजाराम दिघे व इतर मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.




दिनांक २० नोव्हेंबर, २०२१ ते ३० जून, २०२२ या कालावधीत सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या अंमलबजावणी मध्ये गतिमानता व गुणवत्ता वाढीसाठी हे अभियान राबविण्यात आले.

**'महा आवास अभियान-ग्रामीण २०२१-२२' राबविण्याचे उद्देश्ये पुढील प्रमाणे होते.**

I. राज्यात ग्रामीण गृहनिर्माण योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या कामास गतिमान करणे.

ii. ग्रामीण गृहनिर्माण योजनांमध्ये शासकीय यंत्रणा व पंचायतराज संस्था यांचेबरोबरच समाजातील सर्व घटक जसे- स्वयंसेवी संस्था (लायन्स क्लब, रोटरी क्लब, इ.), सहकारी संस्था (साखर कारखाने, दुधसंघ, इ.), खासगी संस्था (Corporates), तंत्र शिक्षण संस्था (IITB, COEP, VNIT, इ.), बँका, लोकप्रतिनिधी, लाभार्थी, ग्रामस्थ, इ. भागधारकांचा सक्रीय सहभाग वाढविणे.

iii. ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रामध्ये नावीन्यपूर्ण उपक्रम राबवून घरांची गुणवत्ता वाढविणे.

iv. ग्रामीण गृहनिर्माण योजनांमधील लाभार्थ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी शासनाच्या विविध योजनांचा कृतिसंगम (Convergence) घडवून आणणे.

v. राज्यात ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रातील भागधारकांची क्षमताबांधणी व जन-जागृतीद्वारे लोक चळवळ उभी करणे.

**'महा आवास अभियान- ग्रामीण २०२१-२२' अंतर्गत दिनांक २० नोव्हेंबर, २०२१ ते ३० जून, २०२२ या कालावधीत विविध उपक्रम राबवून पुढील प्रमाणे फलश्रुती करण्यात आली आहे.**

**i. भूमीहीन लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करुन देणे** या उपक्रमांतर्गत ग्रामीण गृहनिर्माण योजनांतर्गत गरजू, पात्र परंतु घरकुल बांधकामासाठी जागा उपलब्ध नसलेल्या लाभार्थ्यांना पंडीत दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजने मधून **४८५,** शासकीय जागा विनामूल्य उपलब्ध करण्याची योजने



मधून **२,३०४**, ग्रामीण भागातील अतिक्रमणे नियमानुकूल करण्याची योजने मधून **२,२८२** व इतर मार्ग उदा. बक्षीसपत्र, भाडेपट्टा, इ. मधून **६,१०८** अशा एकुण **११,१७९** भूमीहीन लाभार्थ्यांना घरकुल बांधकामासाठी जागेची उपलब्धता केली आहे.

तसेच कमी जागेत जास्त लाभार्थी सामावण्यासाठी राज्यात **६९६ बहुमजली इमारती व ८६२ गृहसंकुले** उभारण्यात आली आहेत.



**ii. घरकुलांना उद्दिष्टांप्रमाणे १०० टक्के मंजूरी देणे** या उपक्रमांतर्गत केंद्र पुरस्कृत व राज्य पुरस्कृत योजनांतर्गत जिल्ह्यांना वितरीत करण्यात आलेल्या घरकुल उद्दिष्टां प्रमाणे घरकुल लाभार्थ्यांची नोंदणी (Registration), Geo tagging, Account Verification, इ. प्रक्रिया किमान कालावधीत पूर्ण करुन **३,२०,७८९** घरकुलांना मंजूरी देण्यात आली.

याकरीता **२,३४,२९१** लाभार्थ्यांना घरकुल मंजूरी पत्राचे वितरण व **१,५५,१५९** भूमिपूजन कार्यक्रम करुन घरकुलांचे बांधकाम सुरु करण्यात आले.

**iii. मंजूर घरकुलांना पहिल्या हप्त्याचे १०० टक्के वितरण करणे** या उपक्रमांतर्गत केंद्र पुरस्कृत व राज्य पुरस्कृत योजनांतर्गत अभियान कालावधीत घरकुलास मंजूरी दिलेल्या एकुण **२,२२,१७३** लाभार्थ्यांना पहिल्या हप्ता वितरीत करण्यात आला असून यापैकी **१,५६,७२९** लाभार्थ्यांना **७ दिवसाच्या आत पहिल्या हप्त्याचे वितरण** करण्यात आले. तसेच पहिला हप्ता वितरणासोबतच मनरेगा मस्टर जनरेट करणेबाबतची कार्यवाही विनाविलंब करण्यात आली.



**iv. सर्व मंजूर घरकुले भौतिक व आर्थिक दृष्ट्या पूर्ण करणे** या उपक्रमांतर्गत केंद्र पुरस्कृत व राज्य पुरस्कृत योजनांतर्गत अभियान कालावधीत सर्व मंजूर घरकुलांचे काम भौतिक व आर्थिक दृष्ट्या पूर्ण करण्यासाठी राज्यात महिला स्वयंसहायता गट/ग्राम संघ/प्रभाग संघ/विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था/शेतकरी उत्पादक कंपनी, इ. समुदाय आधारीत संस्थाद्वारे **७५५ घरकुल मार्ट सुरु करुन** त्याद्वारे




घरकुलाचे बांधकाम साहित्य जसे - दगड, विटा, वाळू, सिमेंट, दारे, खिडक्या, छताचे साहित्य, इ. उपलब्ध करून किमान कालावधीमध्ये **२,३३,३११** घरकुले भौतिकदृष्टया पूर्ण करण्यात आली. यासाठी सरपंच, ग्रामसेवक/ग्राम विकास अधिकारी, ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांनी घरकुलांना वेळोवळी भेटी देणे, आवास प्लस द्वारे घरकुल बांधकामाचे टप्पानिहाय फोटो अपलोड करणे, मनरेगा मस्टर जनरेट करणे, इ. कामे प्राधान्याने करण्यात आली. यामुळे **बहुतांश घरकुले १०० ते १२० दिवसात पूर्ण करण्यात आली.**

त्याचप्रमाणे सर्व घरकुले आर्थिकदृष्ट्या पूर्ण करण्यासाठी लाभार्थ्यांना घरकुल बांधकामाच्या भौतिक प्रगतीनुसार टप्पानिहाय सर्व हप्ते किमान कालावधीत वितरीत करण्यात आले. तसेच गरजे प्रमाणे इच्छूक लाभार्थ्यांना वित्तीय संस्थांकडून गृहकर्जाची उपलब्धता करून देण्यात आली.

**v. प्रलंबित घरकुले (Delayed Houses) पूर्ण करणे** या उपक्रमांतर्गत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत घरकुलांना पहिला हप्ता प्रदान केल्यापासून १२ महिन्यापेक्षा जास्त कालावधी झालेली, मात्र



अद्यापपर्यंत अपूर्ण असलेली प्रलंबित घरकुले (Delayed Houses) प्राधान्याने पूर्ण करण्यासाठी प्रलंबित घरकुलांच्या यादीनुसार घरकुले प्रलंबित राहण्यामागची कारणे शोधून त्या कारणांचे विश्लेषण करुन त्यावर उपाययोजना करत प्रलंबित घरकुले पूर्ण करण्यात आली. याकामी गरजेप्रमाणे तालुका कायदेविषयक सहाय्य व सल्ला समितीच्या सहाय्याने **लोक अदालत** द्वारे लाभार्थ्यांना घरकुल पूर्ण करण्यासाठी प्रवृत्त करण्यात आले.

पूर्ण होऊ न शकणारी प्रलंबित घरकुले प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीणच्या मार्गदर्शक सूचनांनुसार Refund करुन Remand करण्यात आली. तसेच यापुढे प्रलंबित घरकुलांच्या यादीमध्ये नविन घरकुलांचा समावेश होणार नाही याची दक्षता घेण्यात येत आहे.



vi. **ग्रामीण गवंडी प्रशिक्षण पूर्ण करणे** या उपक्रमांतर्गत घरकुलांची गुणवत्ता सुधारण्यासाठी प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत ग्रामीण गवंडी प्रशिक्षण कार्यक्रमाचे उद्दिष्ट प्रशिक्षण देणाऱ्या संस्था (Training Provider) यांच्याशी समन्वय ठेवून **१०,१७८** गवंडी प्रशिक्षण पूर्ण करुन त्यांचे मुल्यांकन(Assessment) त्वरीत पूर्ण केले. तसेच सदर माहिती आवास सॉफ्टवर अद्ययावत करण्यात आली आहे.

प्रशिक्षित ग्रामीण गवंडी व ग्रामपंचायत क्षेत्रातील इतर उपलब्ध गवंडी असे एकुण **४४,५९२** गवंड्यांची ग्रामपंचायतनिहाय यादी तयार करुन त्यांचे पॅनेल बनवून या पॅनेलमधील गवंड्यांचा ग्रामीण गृहनिर्माण योजनांमधील घरकुलांच्या बांधकामात



सहभाग मिळत आहे.

vii. **डेमो हाऊस (Demo House) निर्मिती व उपयोग** या उपक्रमांतर्गत घरकुलांची गुणवत्ता सुधारण्यासाठी व लाभार्थ्यांना मार्गदर्शक ठरण्यासाठी प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत तालुकास्तरीय **३२५** डेमो हाऊसेस पूर्ण करण्यात आले आहे. तसेच जिल्ह्याच्या Geo-Climatic, Socio- Cultural Conditions व Locally Available Construction Materials चा विचार करुन **४** जिल्हास्तरीय डेमो हाऊसेसची निर्मिती करण्यात आली आहे.



तालुकास्तरीय व जिल्हास्तरीय डेमो हाऊसला **४,३१,८३३** घरकुल लाभार्थ्यांच्या प्रत्यक्ष भेटींचे आयोजन करण्यात आले आहे. पूर्ण झालेल्या डेमो हाऊसमध्ये माहिती कक्ष किंवा लाभार्थी / महिला स्वयं सहायता गट यांच्या उत्पादनांच्या विक्रीसाठी महिला स्वयंसहायता गट/ग्रामसंघ/प्रभाग संघ/विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था/शेतकरी उत्पादक कंपनी, इ. समुदाय आधारीत संस्थांच्या सहकार्यातून **१६९** कॉप-शॉप (Co-op Shop) सुरु करण्यात आले.



viii. **सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या लाभार्थ्यांचे आधार सिडींग व जॉब कार्ड मॅपिंग पूर्ण करणे** या उपक्रमांतर्गत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण मधील **२,३५,६५६** लाभार्थ्यांचे आधार कार्ड व **२७,४५,८४४** जॉब कार्ड काढून त्यांचे **मॅपिंग पूर्ण केले.** राज्य पुरस्कृत सर्व आवास योजना मधील **९६,९३२** लाभार्थ्यांचे आधार कार्ड काढून त्यांचे **मॅपिंग पूर्ण केले.**

**ix. शासकीय योजनांशी कृतीसंगम (Convergence) करणे** या उपक्रमांतर्गत शासनाच्या विविध योजनांशी कृतीसंगमातून सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांतील लाभार्थ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी **२,२५,२९,९८७** लाभार्थ्यांना **महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने मधून रोजगार, ६,६३,०८१** लाभार्थ्यांना **स्वच्छ भारत मिशन-ग्रामीण मधून शौचालय, ५,३८,३८३** घरांना **जल जीवन मिशन मधून** नळाने पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, **५,८३,७७५** लाभार्थ्यांना **प्रधानमंत्री उज्वला योजने मधून गॅस जोडणी, ६,१५,४१२** घरांना **सौभाग्य योजने मधून विद्युत जोडणी, ८९,८३१** लाभार्थ्यांना **राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती मिशन मधून उपजिवीकेच्या साधनांची उपलब्धता, ४६,४७२ महाराष्ट्र उर्जा विकास अभिकरण (महाउर्जा)** उर्जेच्या बचतीसाठी, इ. शासकीय योजनांशी कृतीसंगमातून लाभ देण्यात आला.

तसेच **१,४४,९९०** दलित वस्ती सुधार योजना, ८६,०९७ ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधार योजना, २,४६,५८८ जिल्हा परिषद सेस/पंचायत समिती सेस/ग्राम पंचायत सेस, **७८,७४३** सीएसआर निधी इ. च्या माध्यमातून **लाभार्थ्यांना ५,५६,४१८ मूलभूत नागरी सुविधा जसे जोडरस्ते, अंतर्गत रस्ते, ड्रेनेज सिस्टीम, पथदिवे,** इ. ची उपलब्धता केली.

**x. नावीन्यपूर्ण उपक्रम** (Innovations / Best Practices) **राबविणे** या उपक्रमांतर्गत ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या अंमलबजावणीमध्ये गतिमानता व गुणवत्ता येण्यासाठी **३०८ बहुमजली गृहसंकुले (हाऊसिंग अपार्टमेंट)** उभारण्यात आल्या असून त्यांच्या सहकारी संस्था स्थापन करण्याचे काम प्रगतीत आहे. तसेच सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांमधील भूमिहीन लाभार्थ्यांना घरकुल बांधकामाकरीता जागा



उपलब्ध करुन देण्यासाठी ग्रामपंचायत स्तरावर **विविध मार्गांनी उपलब्ध होणाऱ्या जागांची ५,६१८ ठिकाणी लॅण्ड बँक** तयार करण्यात आली. त्याचप्रमाणे लाभार्थ्यांना घरकुल बांधकामाकरीता **वाळू उपलब्ध करुन देण्यासाठी १,१५९ ठिकाणी सॅण्ड बँक ची निर्मिती करण्यात आली.** तसेच **७५,५०३** घरकुल बांधकामामध्ये **वाळूला पर्याय** म्हणून क्रश सॅण्ड, सिमेंट ब्लॉक, फ्लाय ॲश ब्रिक्स, इंटर लॉकींग ब्रिक्स, हॉलो ब्रिक्स, इत्यादींचा वापर घरकुल बांधकामाकरीता करण्यात आला.



**१,१४,२१८** घरकुल बांधकामासाठी स्थानिक बांधकाम साहित्य, नवनवीन बांधकाम तंत्रज्ञान, किफायतशीर बांधकाम तंत्रज्ञान, नैसर्गिक आपत्ती रोधक तंत्रज्ञान, इ. चा वापर करण्यात आला. तसेच घरकुल बांधकामामध्ये फरशी/लादी, रंगरंगोटी, किचन गार्डन/परसबाग, रेन वॉटर हार्वेस्टींग, सौरउर्जा साधने व नेट बिलींग, इ.चा सुध्दा वापर करण्यात आला आहे.



**'महा आवास अभियान-ग्रामीण २०२१-२२' च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी क्षमताबांधणी कार्यक्रम राबविण्यात आले.** यामध्ये **'महा आवास अभियान-ग्रामीण २०२१-२२' राज्यस्तरीय शुभारंभ दिनांक २३ नोव्हेंबर २०२१ रोजी** मा. मंत्री, ग्रामविकास यांच्या शुभहस्ते, मा. राज्यमंत्री, ग्रामविकास व महसूल, मा.अतिरिक्त मुख्य सचिव, ग्रामविकास व पंचायत राज विभाग, संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण व इतर मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आला.

या कार्यशाळेत सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी (जिल्हा परिषद), प्रकल्प संचालक (जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा), राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी, बँक प्रतिनिधी, मिडीया प्रतिनिधी, इत्यादींना अभियानाबाबत मार्गदर्शन करण्यात आले.





राज्यातील सर्व विभागांमध्ये संबंधित विभागीय आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली जिल्ह्यातील जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी (जिल्हा परिषद), अतिरिक्त आयुक्त/ उपायुक्त (आदिवासी विकास, सामाजिक न्याय, कामगार) यांचे उपस्थितीत विभागस्तरीय कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले.

या कार्यशाळांत प्रकल्प संचालक (जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा), प्रकल्प अधिकारी (एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प), सहाय्यक आयुक्त (समाज कल्याण), उप जिल्हा कार्यकारी अधिकारी (महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ), जिल्हा माहिती अधिकारी, गट विकास अधिकारी, विभागीय कार्यालयातील संबंधित अधिकारी/कर्मचारी, बँक प्रतिनिधी, मिडीया प्रतिनिधी, इ. यांना अभियानाबाबत मार्गदर्शन करण्यात आले. सदर कार्यशाळेस राज्यस्तरावरुन राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाचे अधिकारी निरीक्षक म्हणून उपस्थित होते.




राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये मा. पालकमंत्री यांचे अध्यक्षतेखाली तसेच मा.अध्यक्ष, जिल्हा परिषद यांचे प्रमुख उपस्थितीत आणि मा. खासदार, मा. आमदार, जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी (जिल्हा परिषद), प्रकल्प संचालक (जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा), प्रकल्प अधिकारी (एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प), सहाय्यक आयुक्त (समाज कल्याण), उप जिल्हा कार्यकारी अधिकारी (महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ) यांच्या उपस्थितीत जिल्हास्तरीय कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले.

या कार्यशाळांत जिल्ह्यातील सर्व पंचायत समिती सभापती, उपसभापती, गट विकास अधिकारी, तहसिलदार, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा कार्यालयातील संबंधित अधिकारी/कर्मचारी, तालुकास्तरीय डाटा एन्ट्री ऑपरेटर, बँक प्रतिनिधी, मिडीया प्रतिनिधी, इ. यांना अभियानाबाबत मार्गदर्शन करण्यात आले. सदर कार्यशाळेस विभागस्तरावरील अधिकारी हे निरीक्षक म्हणून उपस्थित होते.



राज्यातील सर्व तालुक्यांमध्ये तालुक्याचे मा.आमदार यांचे अध्यक्षतेखाली तसेच पंचायत समिती सभापती, उपसभापती, जिल्हा परीषद सदस्य, पंचायत समिती सदस्य, गट विकास अधिकारी, तहसिलदार यांच्या उपस्थितीत तालुकास्तरीय कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले.

या कार्यशाळांत तालुक्यातील सर्व सरपंच, ग्रामसेवक, तलाठी, पंचायत समिती कार्यालयातील संबंधित अधिकारी/कर्मचारी, स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक, ग्रामीण गृहनिर्माण अभियंता, बँक प्रतिनिधी, मिडीया प्रतिनिधी, इत्यादींना अभियानाबाबत मार्गदर्शन करण्यात आले. सदर कार्यशाळेस जिल्हास्तरावरील



संपर्क अधिकारी हे निरीक्षक म्हणून उपस्थित होते.

राज्यात सर्व गावस्तरावर सरपंच यांच्या अध्यक्षतेखाली ग्रामपंचायत सदस्य व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत ग्रामस्तरीय कार्यशाळा आयोजित करुन त्यामध्ये ग्रामसेवक, तलाठी यांनी अभियानाबाबत सखोल मार्गदर्शन केले.

या कार्यशाळाद्वारे 'महा आवास अभियान-ग्रामीण २०२१-२२ चे यशस्वी अंमलबजावणीसाठी मिळालेली माहिती सर्व लाभार्थी यांना देवून गावातील गतिमान अंमलबजावणीबाबतचे नियोजन करण्यात आले. सदर कार्यशाळेस तालुकास्तरावरील संपर्क अधिकारी हे निरीक्षक म्हणून उपस्थित होते.




या ग्रामस्तरीय कार्यशाळेमध्ये प्रत्येक ग्रामपंचायती मध्ये **१९,०५६ ग्राम कृती गटाचे गठन** करण्यात आले. यामध्ये गावातील प्रभावी व्यक्ती, युवक/युवती, इत्यादींचा समावेश करण्यात आला. उदा. सरपंच, ग्रामसेवक, पोलीस पाटील, शिक्षक, पोलीस इ. प्रभावी व्यक्ती. या गटाने 'महा आवास अभियान-ग्रामीण २०२१-२२' मध्ये गावस्तरावर केल्या जाणाऱ्या व करावयाच्या प्रत्यक्ष उपाय योजनांचा पाठपुरावा करुन अभियान १०० टक्के यशस्वी करण्यासाठी प्रयत्न केले.

गावोगावी लोकप्रतिनिधींच्या उपस्थितीत **लाभार्थ्यांचे मेळावे** आयोजित करुन लाभार्थ्यांना घरकुल बांधकाम व दर्जाबाबत मार्गदर्शन, प्रोत्साहन देणे, तसेच लाभार्थ्यांना घरकुल मंजूरी पत्र वितरण, घरकुलाचे भूमिपूजन कार्यक्रम, घरकुलांचे हप्ते वितरण कार्यक्रम, गृहप्रवेश कार्यक्रम, इ. सारखे उपक्रम राबविण्यात आले.

तालुकास्तरावर/ गावोगावी बँक अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत घरासाठी कर्ज घेवू इच्छिणाऱ्या लाभार्थ्यांसाठी बँक मेळाव्याचे आयोजन करुन लाभार्थ्यांना घरकुल बांधण्यासाठी कर्ज उपलब्ध करून देण्यात आले.

'महा आवास अभियान- ग्रामीण २०२१-२२' अंतर्गत राज्यात राबविण्यात येणाऱ्या विविध घरकुल योजनांबाबत जन जागृती, प्रचार-प्रसिध्दी करण्यासाठी **माहिती, शिक्षण व संवाद (IEC)** च्या विविध उपक्रमांचा यथोचीत वापर करण्यात आला. यामध्ये राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण कार्यालयाने निर्मित केलेल्या व्हिडीओ जाहिराती व ऑडिओ जिंगल्सचे प्रसारण खाजगी टि. व्ही. चॅनल, दूरदर्शन, सिनेमा हॉल, कार्यशाळा, बैठका, मेळावे, रेल्वे स्थानक, बस स्टॅन्ड, घंटा गाडी, इ. वर करण्यात आले. अभियानाचे होर्डिंग, बॅनर, पोस्टर, घडी पुस्तिका, डिजिटल स्टॅन्डी, स्टॅन्डीज, माहिती पुस्तीका, सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांचे माहिती पत्रक, चित्ररथ, इ. अभियानाची प्रचार, प्रसिध्दी व जन-जागृती करण्यात आली. त्याचप्रमाणे Whats app, Facebook, Twitter, Instagram & You Tube Channel इ. समाज




माध्यमांचाही वापर करण्यात आला. तसेच Group मिडीया, आंतरव्यक्ती संवाद (IPC), पारंपारीक मिडीया, इ. उपक्रमांचा यथोचीत वापर करण्यात आला. अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, डॉ. राजाराम दिघे यांनी आकाशवाणी वरील






**दिलखुलास** व **जय महाराष्ट्र** या कार्यक्रमांच्या माध्यमातून अभियाना विषयी माहिती व सर्वांना अभियानात सक्रीय सहभागी होण्याचे आवाहन केले.

**महा आवास अभियान-ग्रामीण २०२१-२२** च्या प्रभावी अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापनासाठी राज्य, विभाग, जिल्हा, तालुका व गाव स्तरावर अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापन समित्यांचे गठन करण्यात आले. या समित्यांनी राज्यस्तर, विभागस्तर, जिल्हास्तर, तालुकास्तर व गावपातळीवरुन क्षमता बांधणी कार्यशाळा, आढावा बैठका, क्षेत्रिय भेटी (Field Visits), Awaas Soft, MIS Formats, इ. द्वारे अभियानाचे सनियंत्रण व मूल्यमापन केले.

'महा आवास अभियान-ग्रामीण २०२१-२२' मध्ये उत्कृष्ट काम करणाऱ्या संस्था व व्यक्तींना पुढीलप्रमाणे **'महा आवास अभियान पुरस्कार २०२१-२२'** देऊन गौरविण्यात येणार आहे.

### -: अ. राज्यस्तरीय पुरस्कार :-

**I. प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण**

I. सर्वोत्कृष्ट विभाग- प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.
ii. सर्वोत्कृष्ट जिल्हे - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.
iii.सर्वोत्कृष्ट तालुके - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.
iv. सर्वोत्कृष्ट ग्रामपंचायत - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.
v. सर्वोत्कृष्ट बहुमजली इमारत, सर्वोत्कृष्ट गृहसंकुल व बहुमजली गृहसंकुल (हाऊसिंग अपार्टमेंट) - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.

**II. राज्य पुरस्कृत आवास योजना**

I. सर्वोत्कृष्ट विभाग- प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.
ii. सर्वोत्कृष्ट जिल्हे - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.
iii.सर्वोत्कृष्ट तालुके - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.
iv. सर्वोत्कृष्ट ग्रामपंचायत - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.
v. सर्वोत्कृष्ट बहुमजली इमारत, सर्वोत्कृष्ट गृहसंकुल व बहुमजली गृहसंकुल (हाऊसिंग अपार्टमेंट) - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.

### -: ब. विभागस्तरीय पुरस्कार :-

**I. प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण**

I. सर्वोत्कृष्ट जिल्हे - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.
ii. सर्वोत्कृष्ट तालुके - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.
iii. सर्वोत्कृष्ट ग्रामपंचायत - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.
iv. शासकीय जागा उपलब्धता व वाळू उपलब्धता सर्वोत्कृष्ट कामगिरी करणारे तालुके - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.

**II. राज्य पुरस्कृत आवास योजना**

I. सर्वोत्कृष्ट जिल्हे - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.
ii. सर्वोत्कृष्ट तालुके - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.
iii. सर्वोत्कृष्ट ग्रामपंचायत - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.
iv. शासकीय जागा उपलब्धता व वाळू उपलब्धता सर्वोत्कृष्ट कामगिरी करणारे तालुके - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.

### -: क. जिल्हास्तरीय पुरस्कार :-

**I. प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण**

I. सर्वोत्कृष्ट तालुके - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.
ii. सर्वोत्कृष्ट क्लस्टर - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.
iii. सर्वोत्कृष्ट ग्रामपंचायत - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.

**II.राज्य पुरस्कृत आवास योजना**

I. सर्वोत्कृष्ट तालुके - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.
ii. सर्वोत्कृष्ट क्लस्टर - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.
iii. सर्वोत्कृष्ट ग्रामपंचायत - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.

### -: ड. तालुकास्तरीय पुरस्कार :-

**I. प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण**

I. सर्वोत्कृष्ट क्लस्टर - प्रथम क्रमांक.
ii. सर्वोत्कृष्ट ग्रामपंचायत - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.
iii.सर्वोत्कृष्ट घरकुल- प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.

**II. राज्य पुरस्कृत आवास योजना**

I. सर्वोत्कृष्ट क्लस्टर - प्रथम क्रमांक.
ii. सर्वोत्कृष्ट ग्रामपंचायत - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.
iii.सर्वोत्कृष्ट घरकुल- प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.

### -: इ. ग्रामपंचायतस्तरीय पुरस्कार :-

**I. प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण**

सर्वोत्कृष्ट घरकुल - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.

**II. राज्य पुरस्कृत आवास योजना**

सर्वोत्कृष्ट घरकुल - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.

दिनांक २० नोव्हेंबर २०२१ ते ३० जून २०२२ या अभियान कालावधीत राबविण्यात आलेल्या उपक्रमांचे मूल्यमापन करून या मूल्यमापनाच्या आधारे राज्य, विभाग, जिल्हा, तालुका, ग्रामस्तरावर उत्कृष्ट कामासाठीच्या पुरस्कारांची नामांकने काढण्यात येतील. विविध स्तरावरील उत्कृष्ट कामासाठीच्या पुरस्कारांची नामांकने त्या त्या स्तरावरील अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापन समित्याव्दारे निवडण्यात येतील.

## मा. पंतप्रधानांनी गरीब कल्याण संम्मेलनाव्दारे साधला घरकुल लाभार्थ्यांशी संवाद

देशाचे मा. पंतप्रधान, श्री. नरेंद्र मोदी यांनी दिनांक ३१ मे, २०२२ रोजी हिमाचल प्रदेश मधील शिमला येथे गरीब कल्याण संम्मेलनामध्ये केंद्र सरकारच्या विविध योजनेच्या लाभार्थ्यांसह केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीणच्या लाभार्थ्यांशी दूरदृष्य प्रणालीव्दारे संवाद साधला. त्यासोबतच त्यांना विविध जन कल्याणकारी योजनांची माहिती देत सर्वांचीच क्षमता बांधणी केली.

मा. पंतप्रधान, श्री. नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकारला ८ वर्षे पूर्ण झाली. त्या निमित्त शिमला येथे गरीब कल्याण सम्मेलनाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी त्यांनी केंद्र पुरस्कृत विविध योजनांच्या लाभार्थ्यांशी दूरदृष्य प्रणालीव्दारे संवाद साधला. याप्रसंगी घरकुल लाभार्थ्यांनी घरकुलामुळे हक्काचं पक्कं घरकुल तर मिळालेच परंतु त्यासोबतच रोजगार, शौचालय, नळ जोडणी, विज जोडणी, गॅस जोडणी, उपजिविकेचे साधन, पक्के रस्ते, पथ दिवे, घन कचरा व सांडपाणी व्यवस्थापन व इतरही नागरी मुलभूत सुविधा मिळाल्याने आमचे जीवनमान उंचावले असल्याच्या प्रतिक्रीया दिल्या.

यावेळी बोलतांना मा. पंतप्रधानांनी सांगितले की, भारताच्या प्रत्येक नागरिकाला सन्मान, सुरक्षा व समृध्दी देणं हा सरकारचा संकल्प आहे. सेवा, सुशासन आणि गरीबांच्या कल्याणासाठी केलेल्या योजनांमुळे सरकार बद्दल मत बदलत असल्याचे मा.पंतप्रधानांनी सांगितले. तंत्रज्ञानाच्या मदतीने भ्रष्टाचार कमी केला असून यावर कायम स्वरूपी तोडगा काढण्याचे प्रयत्न करत असल्याचेही मा.पंतप्रधान, श्री. नरेंद्र मोदी यांना स्पष्ट केले.

गरीब कल्याण संम्मेलन कार्यक्रमाला दूरदृष्य प्रणालीव्दारे सर्व राज्याचे मा. मुख्यमंत्री, मा. उप मुख्यमंत्री यांच्यासह राज्य, जिल्हा, तालुका व ग्रामस्तरावरील सर्व सन्मानिय पदाधिकारी, अधिकारी, कर्मचारी व लोक उपस्थितीत होते.




## शासनाच्या सर्व कल्याणकारी योजना जनतेपर्यंत योग्य पद्धतीने पोहोचल्या
## - मा. ना. श्री. उद्धव ठाकरे, मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य

भारताच्या स्वातंत्र्यप्राप्तीस ७५ वर्ष पूर्ण होत असल्याने देशात आझादी का अमृत महोत्सव व महाराष्ट राज्यात स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव अंतर्गत विविध उपक्रम राबविण्यात येत आहे. याचाच एक भाग म्हणून महाराष्ट्र राज्याचे मा. मुख्यमंत्री, श्री. उद्धव ठाकरे यांनी दिनांक ३१ मे, २०२२ रोजी स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव अंतर्गत केंद्र व राज्य पुरस्कृत विविध योजनांच्या लाभार्थ्यांशी संवाद साधला.

याप्रसंगी महाराष्ट्र राज्याचे मा. उप मुख्यमंत्री, श्री. अजित पवार, मा. पालकमंत्री, मुंबई शहर, श्री. अस्लम शेख, मा. राज्यमंत्री, ग्रामविकास व महसूल श्री. अब्दुल सत्तार, मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन श्री. मनु कुमार श्रीवास्तव, मा. अतिरिक्त मुख्य सचिव, ग्रामविकास व पंचायत राज विभाग, श्री. राजेश कुमार, राज्य नोडल अधिकारी, स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव तथा संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, डॉ. राजाराम दिघे यांच्यासह इतर विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

मा. मुख्यमंत्री लाभार्थी संवाद कार्यक्रमाचे सुत्रसंचलन संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, डॉ. राजाराम दिघे यांनी केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मा. अतिरिक्त मुख्य सचिव, ग्रामविकास व पंचायत राज विभाग, श्री. राजेश कुमार यांनी केले. या कार्यक्रमामध्ये केंद्र व राज्य पुरस्कृत विविध योजनांच्या निवडक लाभार्थ्यांचा सत्कार मा.मुख्यमंत्री यांच्या शुभहस्ते करण्यात आला.



मा.मुख्यमंत्री व मा. उप मुख्यमंत्री यांनी १५ जिल्ह्यातील घरकुल लाभार्थ्यांसह केंद्र व राज्य पुरस्कृत विविध योजनांच्या लाभार्थ्यांशी संवाद साधला. या कार्यक्रमाला सर्व जिल्ह्यांचे विविध योजनांचे लाभार्थी, पदाधिकारी, अधिकारी व लोक दूरदृष्य प्रणालीव्दारे उपस्थित होते.

यावेळी मा. मुख्यमंत्री यांनी सांगितले की, शासनाच्या सर्व कल्याणकारी योजना जनतेपर्यंत योग्य पध्दतीने पोहोचविण्यात येत आहे. तसेच केंद्र व राज्य शासनाच्या योजनांचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्यासाठी शासकीय यंत्रणेचे मोठे योगदान असून यावर्षी विविध आवास योजनेतून ५ लाख घरकुले बांधणार असल्याचे मा. मुख्यमंत्री, श्री. उद्धव ठाकरे यांनी सांगितले.







## Inclusive Rural Development या विषयावर मलेशिया सरकारचे ऑनलाईन प्रशिक्षण


मलेशिया सरकार यांचे मार्फत Malaysian Cooperation Programme (MTCP) अंतर्गत Inclusive Rural Development या विषयावर ऑनलाईन प्रशिक्षण दिनांक २० जून ते २३ जून २०२२ या कालावधीत सकाळी ११.३० ते सायंकाळी ५.३० यावेळेत आयोजित करण्यात आले होते. या प्रशिक्षण कार्यक्रमाकरीता सहभागी होण्याकरीता प्रशिक्षणाचे Brouchure व अप्लीकेशन फॉर्म राज्यातील सर्व जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना ईमेलव्दारे पाठविले. त्यापैकी निवडक जिल्ह्यांना या प्रशिक्षण कार्यक्रमात सहभागी करण्यात आले.


या प्रशिक्षण कार्यक्रमाला राज्यातील नागपूर, चंद्रपुर, उस्मानाबाद, गोंदिया, अमरावती, वाशिम, रायगड, वर्धा, नांदेड, जालना, पालघर, रत्नागिरी, सोलापूर, नंदुरबार, अकोला, भंडारा व जळगांव जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, डॉ. राजाराम दिघे उपस्थित होते.

या प्रशिक्षण कार्यक्रमा दरम्यान इतर विकसीत देशांचे आचार विचाराचे प्रदान करण्यात आले. तसेच इतर विकसनशिल देशांचे तांत्रिक विकासाबाबत चर्चा करण्यात आली. ग्राम विकास सबंधित मलेशियन सरकारच्या पॉलीसी, धोरण व कार्यक्रम या विषयी माहिती देण्यात आली. तसेच ग्रामीण भागातील यशोगाथा, गरीब लोकांना रोजगार उपलब्धती व ग्रामीण भागातील शेती विषयक तंत्रज्ञान या विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले.

या प्रशिक्षण कार्यक्रमात संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, डॉ. राजाराम दिघे यांनी ग्रामीण भागातील विकासाबाबत सादरीकरण केले. यामध्ये ग्रामीण भागातील जनतेसाठी राबविण्यात येणारे प्रकल्प, विविध योजना, शासनाचे धोरणात्मक निर्णय, देशाची व राज्याची घडण व त्यानुसार रोजगार उपलब्धी, कृषी क्षेत्रातील विकसीत तंत्रज्ञान, आरोग्य, शिक्षण, उद्योजकांचा सहभाग व इतर सुविधांबाबत डॉ. राजाराम दिघे यांनी माहिती दिली.

दिनांक २० जून ते २३ जून २०२२ या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या प्रशिक्षणाला डॉ. राजाराम दिघे व जिल्हा परिषदेचे संबंधित मुख्य कार्यकारी अधिकारी पूर्ण वेळ उपस्थित होते.





## प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीणच्या उद्दिष्टपूर्तीसाठी महा आवास अभियान प्रभावी - मा. डॉ. आशिष कुमार गोयल, सह सचिव, ग्रामीण विकास, भारत सरकार

केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीणच्या संनियंत्रण व मूल्यमापनासाठी केंद्र सरकार कडून नियमित बैठका व क्षेत्रिय भेटीचे आयोजन करण्यात येते. याचाच एक भाग म्हणून प्रधानमंत्री आवास योजनेचा आढावा घेण्यासाठी दिनांक ०७ एप्रिल २०२२ रोजी भारत सरकारचे मा. सह सचिव, ग्रामीण विकास विभाग, डॉ. आशिष कुमार गोयल यांनी महाराष्ट्र राज्याचा दौरा केला.

या दौरा कार्यक्रमा दरम्यान भारत सरकारचे मा. सह सचिव, डॉ. आशिष कुमार गोयल यांनी दिनांक ०७ एप्रिल २०२२ रोजी मुंबई येथे महाराष्ट्र शासनाचे मा. अतिरिक्त मुख्य सचिव, ग्रामविकास व पंचायत राज विभाग, महाराष्ट्र शासन, श्री. राजेश कुमार यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीणची आढावा बैठक घेतली. या बैठकीला संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, डॉ. राजाराम दिघे, उप संचालक, श्रीमती मंजिरी टकले व इतर अधिकारी उपस्थित होते.

या बैठकीमध्ये महाराष्ट्र राज्यात प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत घरकुल मंजूरी, घरकुल बांधकाम, डेमो हाऊस बांधकाम, ग्रामीण गवंडी प्रशिक्षण, निधी वितरण व ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या गतिमानता व गुणवत्तेसाठी राज्यात राबविण्यात येत असलेल्या महा आवास अभियान २.० च्या प्रगती बाबत संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, महाराष्ट्र राज्य, डॉ. राजाराम दिघे यांनी सादरीकरण केले. तसेच अभियान कालावधीत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत जास्तीत जास्त घरकुले पूर्ण करणार असल्याचे डॉ. राजाराम दिघे यांनी मा. सह सचिव, ग्रामीण विकास विभाग, डॉ. आशिष कुमार गोयल यांना सांगितले. तसेच ग्रामीण गृहनिर्माण योजना तळागळापर्यंत पोहोचविण्यासाठी माहिती, शिक्षण व संवाद उपक्रमांतर्गत राज्य व्यवस्थापन कक्षाने निर्मित केलेले पोस्टर, घडी पुस्तिका, दिनदर्शिका, दैनंदिनी, मार्गदर्शक पुस्तिका, महा आवास त्रैमासिके व महा आवास अभियान पुरस्काराचे सन्मान चिन्हे मा. सह सचिव, ग्रामीण विकास विभाग, डॉ. आशिष कुमार गोयल यांना डॉ. राजाराम दिघे यांनी दाखविले.

प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण च्या कामास महाराष्ट्र राज्यात गतिमानता व गुणवत्ता आली असून याकरीता राज्यात राबविण्यात येत असलेले महा आवास अभियान-ग्रामीण अत्यंत प्रभावी माध्यम असून याची दखल केंद्र शासनाने घेतली असल्याचे मा. सह सचिव, ग्रामीण विकास विभाग, डॉ.आशिष कुमार गोयल यांनी सांगितले.






## प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीणच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी केंद्र शासनाच्या बैठका

प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीणच्या कामास गतिमान करणे व उद्दिष्टपूर्तीसाठी केंद्र शासनाच्या अधिकाऱ्यांकडून माहे एप्रिल ते जून २०२२ या कालावधीत सर्व राज्यांच्या नियमित बैठका आयोजित करण्यात आल्या. या बैठकांना महाराष्ट्र राज्याच्या वतीने संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, डॉ. राजाराम दिघे उपस्थित होते.

या बैठकांमध्ये घरकुलांना मंजूरी, घरकुल बांधकामाची प्रगती, प्रलंबित घरकुले, सर्व हप्त्यांचे वितरण, घरकुले आर्थिकदृष्ट्या पूर्ण करणे, ग्रामीण गवंडी प्रशिक्षण इ. चा आढावा घेण्यात आला.



## महा आवास अभियान २.० मध्ये गतिमानता आणण्याची आवश्यकता
## मा. अतिरिक्त मुख्य सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग, श्री. राजेश कुमार

दिनांक २९ एप्रिल, २०२२ रोजी मा. अतिरिक्त मुख्य सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग, श्री.राजेश कुमार यांच्या अध्यक्षतेखाली व संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, डॉ.राजाराम दिघे यांच्या प्रमुख उपस्थितीत राज्यातील सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी (जिल्हा परिषद), प्रकल्प संचालक (जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा), उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) व गट विकास अधिकारी (पंचायत समिती) यांची दूरदृष्य प्रणालीव्दारे महा आवास अभियान २.० ची बैठक घेण्यात आली.

या बैठकीमध्ये महा आवास अभियान २.० अंतर्गत अभियान कालावधीत १० उपक्रमांच्या प्रगतीचे सादरीकरण डॉ. राजाराम दिघे यांनी केले. त्यानुसार घरकुल मंजूरी व पहिला हप्ता वितरण सप्ताह दिनांक १ ते ७ मे, २०२२ या कालावधीत राबविणे. पूर्णत्वास आलेली घरकुले तात्काळ पूर्ण करण्यासाठी दिनांक १ ते १५ मे २०२२ या कालावधीत घरकुल पंधरवडा राबविणे. प्रलंबित घरकुले शुन्यावर आणणेसाठी १ ते ३१ मे २०२२ या कालावधीत मोहिम राबविणे. तसेच दिनांक १ ते ३१ मे २०२२ या कालावधीत भूमिहीन लाभार्थ्यांना जागा उलब्ध करून देणे. अशा सूचना मा.अतिरिक्त मुख्य सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग, श्री.राजेश कुमार यांनी दिल्या.

गेल्यावर्षीच्या तुलनेत यावर्षी महा आवास अभियान २.० ची प्रगती असमाधानकारक असून या अभियानामध्ये गतिमानता आणण्याची आवश्यकता असल्याचे मा. अतिरिक्त मुख्य सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग, श्री.राजेश कुमार यांनी सांगितले.




## संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण यांच्या कडून महा आवास अभियान २.० च्या कामाची पहाणी

राज्यात दिनांक २० नोव्हेंबर, २०२१ पासून महा आवास अभियान २.० ची अंमलबजावणी सुरू आहे. या अभियानांतर्गत विविध उपक्रम राबवून झालेल्या कामांची पाहणी करण्याकरीता संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, डॉ.राजाराम दिघे यांनी ठाणे व सोलापूर जिल्ह्याचा दौरा केला.

दिनांक ०३ जून, २०२२ रोजी सोलापूर जिल्ह्यातील पंचायत समिती सांगोला व दिनांक १५ जून, २०२२ रोजी ठाणे जिल्ह्यातील शहापूर व भिवंडी तालुक्यातील डेमो हाऊस, उत्कृष्ट घरकुलास भेट दिली. त्याचप्रमाणे अभियान कालावधीत विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबविणे व घरकुल योजनांबाबत उपस्थित अधिकारी, कर्मचारी व लाभार्थी यांना डॉ.राजाराम दिघे यांनी मार्गदर्शन केले.




## राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाच्या अधिकाऱ्यांच्या क्षेत्रिय भेटी

महा आवास अभियान २.० अंतर्गत झालेल्या कामांची पाहणी करण्याकरीता राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाच्या अधिकाऱ्यांनी जिल्ह्यांनी क्षेत्रिय भेटी देवून कामांची पहाणी केली. यामध्ये उप संचालक तथा नागपूर विभागाचे संपर्क अधिकारी श्री. नीलेश काळे यांनी दिनांक ०६ एप्रिल, २०२२ रोजी चंद्रपूर जिल्ह्यातील भद्रावती पंचायत समिती व तहसिल कार्यालयाला भेट दिली. यावेळी सँड बँक व लँड बँक तयार करणेबाबत मार्गदर्शन केले. तसेच भद्रावती तालुक्यातील भटाळी येथील गृह



संकुलाच्या कामाची पाहणी करून भद्रावती येथे सँड बँकची पाहणी केली. दिनांक ०१ मे, २०२२ रोजी श्री. नीलेश काळे यांनी सोलापूर येथे जिल्हास्तरीय डेमो हाऊसला भेट दिली.

उप संचालक तथा अमरावती विभागाच्या संपर्क अधिकारी श्रीमती मंजिरी टकले यांनी दिनांक १२ एप्रिल, २०२२ रोजी यवतमाळ मधील ग्रामपंचायत कामठवाडा व पंचायत समिती दारव्हा अंतर्गत घरकुलाची पाहणी व डेमो हाऊसला देण्यात आली. दिनांक १३ एप्रिल, २०२२ रोजी अकोला जिल्ह्यातील पंचायत समिती पातूर येथील डेमो हाऊस भेट व ग्रामपंचायत बोडखा येथे घरकुल भूमीपूजन केले.



प्र. सहाय्यक संचालक (लेखा) तथा कोकण विभागाचे संपर्क अधिकारी श्री. संजय घोगळे यांनी दिनांक २४ जून, २०२२ रोजी पालघर जिल्ह्यातील वाडा तालुक्यामधील रोटरी क्लब, आशियाना अंतर्गत बांधलेल्या घरकुलांना भेटी दिल्या. तसेच गातेस, डाहे, मांडवा व परळी येथील घरकुलांची पहाणी व पंचायत समिती वाडा येथे डमो हाऊसला भेट दिली.



नाशिक विभागाचे संपर्क अधिकारी श्री. मधुकर वाघ यांनी दिनांक ११ ते १३ एप्रिल, २०२२ कालावधीत नंदुरबार तालुक्यातील खामगाव, व वरूळ, जळगाव जिल्ह्यातील चोपडा तालुक्यातील अडावद गावांतील रामजी पाडा, चोपडा तालुक्यातील उनपदेव राजाराम नगर व धुळे जिल्ह्यातील साक्री तालुक्यातील जैताणे (निजामपूर) येथे गृह संकुल बांधकामाची पाहणी, घरकुलांची पाहणी व डेमो हाऊसला भेट दिली. दिनांक १८ व १९ मे, २०२२ रोजी नाशिक जिल्ह्यातील नांदगाव पंचायत समिती येथे अतिक्रमण नियमानुकूल कामाचा आढावा, नाशिक जिल्ह्यातील त्र्यंबकेश्वर पंचायत समिती अंतर्गत डेमो हाऊसला भेट व पत्र्याचा पद वेळुंजे डेमो हाऊसची पाहणी व घरकुल कामाची पाहणी केली.



पुणे विभागाचे संपर्क अधिकारी श्री. परमेश्वर शेलार यांनी दिनांक ११ ते १३ एप्रिल, २०२२ रोजी पुणे, सातारा व सोलापूर जिल्ह्यातील पंचायत समिती मावळ, भोर, सातारा, पाटण, सोलापूर व नाव अंतर्गत डेमो हाऊस, कॉप-शॉप व लाभार्थी मेळाव्याला भेट दिली. तसेच ग्रामपंचायतींना भेटी देवून घरकुल कामांची पाहणी केली. दिनांक ३० जून, २०२२ रोजी सातारा जिल्ह्यातील पाटण पंचायत समिती अंतर्गत ग्रामपंचायत वाघापूर येथे भेट देवून चिरा दगडामध्ये बांधकाम केलेल्या घरांची पहाणी केली.




दिनांक १३ मे, २०२२ रोजी श्री. राम आघाव, राज्य समन्वयक (माहिती व तंत्रज्ञान) व श्री. दिनेश मोवळे, राज्य प्रशिक्षण समन्वयक (माहिती, शिक्षण व संवाद) यांनी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, अकोला येथे भेट देवून श्री. राम आघाव यांनी आवास प्लस प्रणालीच्या तांत्रिक अडचणी सोडविल्या तर श्री. दिनेश मोवळे यांनी सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजना व महा आवास अभियान २.० च्या प्रचार, प्रसिध्दी व जन-जागृतीसाठी राबवावयाच्या माहिती, शिक्षण व संवाद उपक्रमांबाबत मार्गदर्शन केले. तसेच त्यांनी बाळापूर पंचायत समितीच्या डेमो हाऊसला भेट दिली.

## महाराष्ट्र विधान मंडळाच्या अनुसूचित जमाती कल्याण समितीचा पालघर दौरा

दिनांक २९ एप्रिल, २०२२ रोजी महाराष्ट्र विधान मंडळाच्या अनुसूचित जमाती कल्याण समितीने पालघर जिल्हाचा दौरा केला. यामध्ये समिती सदस्य मा. आमदार, श्री. शिरिष दादा चौधरी, मा.आमदार, श्री. राजेश पाडवी व मा. आमदार, श्री.रमेश पाटील उपस्थित होते.

या दौऱ्या दरम्यान समिती सदस्यांनी पालघर जिल्ह्यातील जव्हार तालुक्यामधील ग्रामपंचायत रायतळे येथे आदिम कातकरी जमातींच्या लोकांसाठीच्या बांधकाम प्रगतीत असलेल्या गृह संकुलाच्या कामाची पाहणी केली. या गृह संकुलाच्या बांधकामाबाबत सर्व सन्माननिय समिती सदस्यांनी समाधान व्यक्त केले. तसेच अशा प्रकारचे नाविन्यपूर्ण उपक्रम आपल्या मतदार संघातही राबविणार असल्याचे सांगितले. सर्व सन्माननिय समिती सदस्यांनी उपस्थित घरकुल लाभार्थ्यांशी चर्चा केली. तसेच इतरही शासकीय योजनाचा लाभ सदर गृह संकुलांच्या लाभार्थ्यांना देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे आश्वासन समिती सदस्यांनी लाभार्थ्यांना दिले.

यावेळी पालघर जिल्ह्यातील जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक श्री. तुषार माळी, जिल्हा जल जीवन मिशनचे प्रकल्प संचालक श्री. पारस्कर, पंचायत समिती जव्हारचे सहायक गटविकास अधिकारी श्री. येदे, अभियंता श्री. वाघमारे, श्री. राथड, विस्तार अधिकारी श्री. पाटील, श्री. पराते, प्रशासक श्री. चौधरी, ग्रामसेवक श्री. खिरारी व गृह संकुलाचे सर्व १९ घरकुल लाभार्थी उपस्थित होते.



## महा आवास अभियान २.० मध्ये सर्वोत्कृष्ट कामगिरी करावी - श्री. निलेश गटणे

औरंगाबाद जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री. निलेश गटणे यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १० जून, २०२२ रोजी जिल्हा परिषद औरंगाबाद येथे जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक, श्रीमती संगीता देवी पाटील व उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), श्री. भोकरे यांच्या प्रमुख उपस्थितीत महा आवास अभियान २.० ची आढावा बैठक घेण्यात आली.

या बैठकीला जिल्ह्यातील सर्व पंचायत समितीचे गटविकास अधिकारी, घरकुल तालुका समन्वयक, विस्तार अधिकारी पंचायत, जिल्हा घरकुल समन्वयक श्री. राहुल वाघ, जिल्हा प्रोग्रामर श्री. सुदेश रोकडे, जिल्हा डेटा एंट्री ऑपरेटर श्री.निलेश राठोड, ग्रामीण गृहनिर्माण अभियंता, व तालुका डेटा एंट्री ऑपरेटर उपस्थितीत होते.

या बैठकीमध्ये अपूर्ण घरकुले पूर्ण करणे, घरकुलांना तात्काळ मंजुरी देणे, मंजूर घरकुलांना तात्काळ पहिल्या हप्त्याचे वितरण करणे व अभियानात सर्वोत्कृष्ट कामगिरी करण्याच्या सुचना श्री. निलेश गटणे, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिल्या.



## वर्धा जिल्ह्याचे मा. पालकमंत्री यांच्या शुभहस्ते घरकुल बांधकामासाठी जागा वाटप

दिनांक ०४ एप्रिल, २०२२ रोजी हिंगणघाट येथे वर्धा जिल्ह्याचे मा. पालकमंत्री श्री. सुनिल केदार यांच्या शुभहस्ते व मा.आमदार श्री. रंजित कांबळे, मा.आमदार श्री.समीरभाऊ कुणावार यांच्या प्रमुख उपस्थितीत अतिक्रमण धारक घरकुल लाभार्थ्यांचे अतिक्रमण नियमानुकूल करून जागा वाटप करण्यात आल्या. यावेळी पंचायत समितीचे गट विकास अधिकारी, तहसिलदार, घरकुल लाभार्थी, यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या शुभहस्ते महा आवास त्रैमासिक प्रकाशन व महा आवास समाज माध्यमांचा शुभारंभ

दिनांक ३१ मे २०२२ रोजी स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव अंतर्गत मा. मुख्यमंत्री यांचा लाभार्थी परिसंवाद आयोजित करण्यात आला होता. या प्रसंगी राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण कार्यालयाचे त्रैमासिक व महा आवासच्या विविध समाज माध्यमांचा शुभारंभ मा. मुख्यमंत्री, श्री. उद्धव ठाकरे यांच्या शुभहस्ते व मा. उप मुख्यमंत्री, श्री. अजित पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आला.

याप्रसंगी मा. पालकमंत्री मुंबई शहर, श्री.अस्लम शेख, मा. राज्यमंत्री, ग्रामविकास व महसूल श्री. अब्दुल सत्तार, मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन श्री. मनु कुमार श्रीवास्तव, मा. अतिरिक्त मुख्य सचिव, ग्रामविकास व पंचायत राज विभाग, श्री. राजेश कुमार, राज्य नोडल अधिकारी, स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव तथा संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, डॉ. राजाराम दिघे यांच्यासह इतर विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.




यावेळी राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाचे महा आवास त्रैमासिक माहे जानेवारी ते मार्च २०२२ या अंकाचे प्रकाशन करण्यात आले. या अंकामध्ये माहे जानेवारी ते मार्च २०२२ या कालावधीत ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रात घडलेल्या घडामोडींचा आढावा, विविध योजनांचे अहवाल, फोटो गॅलरी व मिडीया गॅलरी, इ. बाबींचा समावेश आहे.

केंद्र व राज्य पुरस्कृत विविध ग्रामीण गृहनिर्माण योजनाच्या प्रचार, प्रसिद्धी व जन-जागृतीसाठी Maha Awaas Facebook, Maha AwaasTweeter & Maha Awaas YouTube channel, इ. समाज माध्यमांचा शुभारंभ करण्यात आला. या समाज माध्यमांव्दारे ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रात दैनंदिन घडणाऱ्या घडामोडींना लेख, फोटो, ऑडिओ व व्हिडिओ याव्दारे व्यापक प्रमाणात प्रसिध्दी देवून ग्रामीण गृहनिर्माण योजनांची माहिती सर्व सामान्य जनतेपर्यंत पोहचविण्यास मदत होईल.



## मा. मंत्री, ग्राम विकास यांच्या शुभहस्ते जिल्हास्तरीय डेमो हाऊसचे लोकार्पण

महा आवास अभियान २.० अंतर्गत कोल्हापूर येथे जिल्हा परिषद आवारात बांधण्यात आलेल्या जिल्हास्तरीय डेमो हाऊस लोकार्पण सोहळा शिवराज्याभिषेक दिनी ६ जून, २०२२ रोजी मा. मंत्री, ग्राम विकास, श्री. हसन मुश्रीफ यांच्या शुभहस्ते व कोल्हापूरचे मा. पालकमंत्री सतेच उर्फ बंटी पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. याप्रसंगी जिल्ह्यातील सर्व सबंधित अधिकारी उपस्थित होते.



गतवर्षी महा आवास अभियान-ग्रामीण २०२०-२१ मध्ये पंचायत समिती आवारामध्ये डेमो हाऊस उभारण्यात आले. यावर्षी महा आवास अभियान २.० अंतर्गत जिल्ह्याच्या Geo-Climatic, Socio-Cultural Conditions व Locally Available Construction Materials चा विचार करुन जिल्हास्तरीय डेमो हाऊसेसची निर्मिती करण्यात आली आहे.



## महा आवास अभियानाबाबत संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण यांची 'दिलखुलास' व 'जय महाराष्ट्र' कार्यक्रमात मुलाखत

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय निर्मित 'दिलखुलास' व 'जय महाराष्ट्र' या कार्यक्रमात संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, डॉ. राजाराम दिघे यांची महा आवास अभियानाबाबत विशेष मुलाखत प्रसारित करण्यात आली. जेष्ठ पत्रकार रणधीर कांबळे यांनी ही मुलाखत घेतली.

'दिलखुलास' कार्यक्रमावरील मुलाखत राज्यातील आकाशवाणीच्या सर्व केंद्रांवरून व न्यूज ऑन एयर या मोबाईल ॲपवर बुधवार दि. ६ एप्रिल, गुरूवार ७ एप्रिल, शुक्रवार ८ एप्रिल व शनिवार ९ एप्रिल २०२२ रोजी सकाळी ७.२५ ते ७.४० या वेळेत प्रसारित करण्यात आली. तसेच 'जय महाराष्ट्र' या कार्यक्रमावरील मुलाखत महासंचालनालयाच्या समाज माध्यमांवरून गुरूवार दिनांक ०२ जून २०२२ रोजी सायं. ७.३० वाजल्यापासून प्रसारित करण्यात आली.

घर हा प्रत्येकाच्या जिव्हाळ्याचा प्रश्न आहे. केंद्र व राज्य शासन प्रत्येक कुटुंबाला आपल्या हक्काचे आणि मालकीचे पक्के घर मिळावे यासाठी प्रयत्नशील आहे. विशेषतः ग्रामीण भागात घरांची निर्मिती व्हावी, सर्वसामान्यांना हक्काचे पक्के घर मिळावे यासाठी राज्य शासनाच्या ग्राम विकास विभागाने महा आवास अभियान-ग्रामीणची सुरूवात केली असून त्याद्वारे लाखो गरिब, गरजू, भूमिहीन व बेघरांचे घरकुलाचे स्वप्न पूर्णत्वास जात आहे. असे महत्त्वाकांक्षी अभियान राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालय राबवित आहे. याच विषयी अधिक सविस्तर माहिती राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाचे संचालक डॉ. राजाराम दिघे यांनी 'दिलखुलास' व 'जय महाराष्ट्र' या कार्यक्रमातून दिली. जेणेकरून या कार्यक्रमांच्या माध्यमातून महा आवास अभियान व सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजना बाबत प्रचार, प्रसिध्दी व जन-जागृती होण्यास मदत होईल.






## मा. पालकमंत्री यांच्या शुभहस्ते यवतमाळ येथे महा आवास अभियानाच्या प्रचार, प्रसिध्दी व जन-जागृतीसाठी डिजिटल माध्यमांचा शुभारंभ

जिल्हा परिषद यवतमाळचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांचे संकल्पनेतून व जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक यांचे मार्गदर्शनाखाली महा आवास अभियानाच्या प्रचार, प्रसिध्दी व जन-जागृतीसाठी एलसीडी टि.व्ही. व डिजिटल बॅनर जिल्हा परिषदेच्या आवारामध्ये प्रदर्शित करण्यात आले.

महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून दिनांक ०१ मे, २०२२ रोजी या डिजिटल प्रसार व प्रसिध्दीच्या माध्यमांचा शुभारंभ यवतमाळ जिल्ह्याचे मा.पालकमंत्री, श्री. संदीपान भुमरे यांचे शुभहस्ते फित कापून करण्यात आला. या प्रसंगी जिल्हाधिकारी, श्री. अमोल येडगे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, प्रकल्प संचालक सबंधित अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

या डिजिटल एलसीडी व बॅनरच्या माध्यमातून जिल्हा परिषद अंतर्गत विविध विभागात कामा निमित्ताने येणाऱ्या सर्व सामान्य नागरिक, लोकप्रतिनिधी यांना विविध शासकीय योजनांची माहिती व्हावी. तसेच महा आवास अभियान-ग्रामीण अंतर्गत राबविण्यात येणारे उपक्रम व त्यापासून जनतेला मिळणारा लाभ याविषयीची जन-जागृती व्हावी. याकरीता विविध ग्रामीण गृहनिर्माण योजनांची



माहिती दर्शविणारे फलक व राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालय, नवी मुंबई निर्मित महा आवास अभियानाच्या व्हिडिओ जाहिरातीचे प्रसारण एलसीडी स्क्रीनवर करण्यात येत आहे. यामुळे विविध ग्रामीण गृहनिर्माण योजनांची अंमलबजावणी अधिक प्रभावी व परिणात्मक होईल, मत असे जिल्हा परिषद यवतमाळचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी व्यक्त केले.

## मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांना राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाने प्रकाशित केलेल्या त्रैमासिक व दैनंदिनीची भेट

संचालक राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, डॉ. राजाराम दिघे यांनी दिनांक १८ एप्रिल, २०२२ रोजी मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, श्री. मनु कुमार श्रीवास्तव यांना राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाने प्रकाशित केलेल्या महा आवास त्रैमासिक व कार्यालयाची दैनंदिनी भेट केली.

यावेळी डॉ. राजाराम दिघे यांनी मा. मुख्य सचिव यांना राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालया मार्फत राबविण्यात येणाऱ्या केंद्र व राज्यपुरस्कृत योजना बाबत सविस्तर माहिती दिली. तसेच राज्यात विविध ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या कामात गतिमानता व गुणवत्ता आणण्यासाठी गेल्यावर्षी राबविण्यात आलेले व यावर्षी राबविण्यात येत असलेले महा आवास अभियानाबाबत माहिती दिली. तसेच राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयामार्फत प्रकाशित होणारे त्रैमासिक व दैनंदिनी मा. मुख्य सचिवांना भेट देत यामध्ये समाविष्ठ असलेल्या बाबींची सविस्तर माहिती संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, डॉ. राजाराम दिघे यांनी मा. मुख्य सचिव यांना दिली.



## अभियानाच्या प्रचार, प्रसिध्दी, जन-जागृतीसाठी ऑडिओ व व्हिडिओ जाहिरातीचे प्रसारण

## माहिती, शिक्षण व संवाद उपक्रमात जळगाव जिल्ह्याची कौतुकास्पद कामगिरी

महा आवास अभियान २.० च्या प्रचार, प्रसिध्दी व जन-जागृतीसाठी राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाने माहिती, शिक्षण व संवाद उपक्रमांतर्गत अभियानातील विविध उपक्रमावर आधारीत व्हिडीओ जाहीराती व ऑडिओ जिंगल्सची निर्मिती केली.

अभियानाच्या व्हिडीओ जाहिरातीचे प्रसारण दूरदर्शन व इतर खाजगी दूरचित्रवाणी, वृत्त वाहिन्यांवर तर जिंगलसचे प्रसारण आकाशवाणी, एफ. एम. रेडिओ, कम्युनिटी रेडिओ व बस स्थानकांवर राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयामार्फत करण्यात आले.

संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, नवी मुंबई यांच्या सूचनेनुसार या सर्व व्हिडीओ जाहिराती व जिंगल्सला खाजगी केबल, घंटा गाडी, कार्यशाळा, बैठका, मेळावे, ग्राम व तालुकास्तरीय बाजारपेठेत, चित्रपट गृह, व्हाटसॲप, फेसबुक, ट्विटर व युट्युब इ. ठिकाणी जिल्हा व तालुका स्तरीय यंत्रणेव्दारे प्रसारीत करण्यात आल्या.

जळगांव जिल्ह्याने स्वयंस्फूर्तीने अभियानाच्या व्हिडीओ जाहीराती व ऑडिओ जिंगल्सचे प्रसारण जिल्हा तसेच तालुकास्तरावरील रेल्वे स्थानकावर विनामुल्य केल्याने माहिती, शिक्षण व संवाद उपक्रमांतर्गत कौतुकास्पद कामगिरी केली असल्याचे संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण डॉ. राजाराम दिघे यांनी मत व्यक्त केले.






# महा आवास अभियान २.० अंतर्गत लाभार्थी मेळावे, घरकुल मंजूरी पत्र वाटप व मान्यवरांच्या शुभहस्ते पहिल्या हप्त्याचे वितरण

दिनांक २१ एप्रिल, २०२२ रोजी पुणे जिल्ह्यातील पंचायत समिती हवेली येथील अपूर्ण घरकुल लाभार्थ्यांचा मेळावा घेण्यात आला. या घरकुल लाभार्थी मेळाव्याला ग्रामसेवकासह ४० घरकुल लाभार्थी उपस्थित होते.

महा आवास अभियान २.० अंतर्गत दिनांक ०१ मे, २०२२ रोजी नांदेड जिल्ह्यातील पंचायत समिती देगलूर येथे प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण मधील घरकुल मंजूर लाभार्थ्यांना मा. आमदार श्री. जितेश रावसाहेब अंतापुरकर यांच्या शुभहस्ते व उपविभागीय अधिकारी श्रीमती सौम्या शर्मा व गट विकास अधिकारी श्री. राजकुमार मुक्कावार उपस्थित घरकुल मंजूरी पत्र व पहिला हप्ता वितरण करण्यात आले.

माढा तालुक्यातील ग्रामपंचायत आरण येथे जिल्हा परिषद सदस्य भारत आबा शिंदे यांच्या उपस्थितीत अपूर्ण घरकुले व घरकुल बांधकामास सुरूवात न करणारे लाभार्थी यांचा मेळावा घेण्यात आला. यावेळी लाभार्थ्यांच्या घरकुल बांधकामाविषयी अडीअडचणी विचारून त्यावर मार्गदर्शन करून लवकरात लवकर घरकुलाचे बांधकाम पूर्ण करण्याच्या सूचना लाभार्थ्यांना दिल्या.



दिनांक ०६ मे, २०२२ रोजी आरमोरी तालुक्यातील ग्रामपंचायत वडधा मधील प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीणच्या घरकुल मंजूर लाभार्थ्यांना मा. आमदार श्री.कृष्णाजी गाबे यांच्या शुभहस्ते व तहसिलदारश्री. कल्याण कुमार डहाट व गटविकास अधिकारी श्री. चेतन हिवंज यांच्या उपस्थितीत तहसिल कार्यालय आरमोरी येथे घरकुल मंजूरी आदेश वितरीत करण्यात आले.

दिनांक १३ मे, २०२२ रोजी सोलापूर जिल्ह्यातील मोहोळ तालुक्यांतर्गत पेनुर या गावी तहसील कार्यालय मोहोळ व पंचायत समिती मोहोळ अंतर्गत महा आवास अभियान व विविध ग्रामीण गृहनिर्माण योजनांची माहिती लाभार्थ्यांना मिळावी यासाठी केंद्र व राज्य पुरस्कृत विविध योजनांच्या माहिती दर्शक स्टॉल लावण्यात आले. तसेच या कार्यक्रमामध्ये मा. आमदार श्री. यशवंत तात्या माने यांच्या शुभहस्ते व जिल्हाधिकारी श्री. मिलिंद शंभरकर, गट विकास अधिकरी श्री. गणेश मोरे व तहसीलदार श्री. प्रशांत बेडसे पाटील यांच्या उपस्थितीत रमाई आवास योजनेच्या लाभार्थ्यांना प्रातिनिधिक स्वरुपाचा धनादेश देण्यात आले.




## मान्यवरांच्या हस्ते डेमो हाऊस लोकार्पण व कॉप-शॉप चा शुभारंभ

महा आवास अभियान २.० उपक्रमांतर्गत तालुका व जिल्हास्तरीय डेमो हाऊस बांधण्यात आले. पूर्ण झालेल्या डेमो हाऊसमध्ये माहिती कक्ष किंवा लाभार्थी/महिला स्वयं सहायता गट यांच्या उत्पादनांच्या विक्रीसाठी महिला स्वयंसहायता गट/ग्रामसंघ/प्रभाग संघ/विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था/शेतकरी उत्पादक कंपनी, इ. समुदाय आधारीत संस्थांच्या सहकार्यातून कॉप-शॉप सुरु करण्यात आले आहे.

या डेमो हाऊसचे लोकार्पण व कॉप-शॉपचे उद्घाटन तालुका व जिल्हास्तरावर मा. पालकमंत्री, मा. खासदार, मा. आमदार, लोकप्रतिनिधी व इतर मान्यवरांच्या शुभहस्ते करण्यात आले. तालुकास्तरीय व जिल्हास्तरीय डेमो हाऊसला घरकुल लाभार्थ्यांच्या प्रत्यक्ष भेटींचे आयोजन करण्यात येत आहे.



## मा. मंत्री, ग्राम विकास यांच्याकडून राज्यस्तरीय महा आवास अभियान पुरस्कार जाहीर



सन २०२०-२१ मध्ये राज्यात राबविण्यात आलेल्या महा आवास अभियान-ग्रामीण चे राज्यस्तरीय पुरस्कार विजेत्यांची नावे दिनांक २७ एप्रिल, २०२२ रोजी मा. मंत्री, ग्राम विकास, श्री. हसन मुश्रीफ यांनी जाहीर केली आहेत. राज्यात राबविण्यात आलेल्या महा आवास अभियान-ग्रामीण २०२०-२१ या अभियानात ५ लाख पेक्षा जास्त घरकुले बांधून पूर्ण झाली असल्याचे मा. मंत्री महोदयांनी सांगितले.

या अभियानामधे केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत आवास योजना मध्ये उत्कृष्ट काम करणाऱ्या संस्था किंवा व्यक्ती यांना अभियानाच्या १० उपक्रमांमध्ये अभियान कालावधीत केलेल्या कामाचे एकत्रित गुणांकन करुन पुढीलप्रमाणे राज्यस्तरीय महा आवास अभियान पुरस्कार जाहीर करण्यात आले असल्याची माहिती मा.मंत्री, ग्राम विकास, श्री. मुश्रीफ यांनी दिली.

### १) सर्वोत्कृष्ट विभाग

**प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण -** कोकण - प्रथम, नागपूर - द्वितीय, नाशिक-तृतीय.

**राज्य पुरस्कृत आवास योजना -** कोकण - प्रथम, नाशिक - द्वितीय, पुणे - तृतीय.

### २) सर्वोत्कृष्ट जिल्हे

**प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण -** गोंदिया - प्रथम, धुळे - द्वितीय, ठाणे - तृतीय.

**राज्य पुरस्कृत आवास योजना -** अहमदनगर - प्रथम, रत्नागिरी - द्वितीय, वर्धा - तृतीय.

### ३) सर्वोत्कृष्ट तालुके

**प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण -** गोरेगाव, जि.गोंदिया - प्रथम, गगनबावडा, जि.कोल्हापूर - व्दितीय, अकोले, जि.अहमदनगर - तृतीय.

**राज्य पुरस्कृत आवास योजना -** सडक अर्जुनी, जि.गोंदिया - प्रथम, मुक्ताईनगर, जि.जळगाव - व्दितीय, कागल जि.कोल्हापूर - तृतीय.

### ४) सर्वोत्कृष्ट ग्रामपंचायती

**प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण -** नाव, जि.सातारा - प्रथम, वाडोस, जि.सिंधुदुर्ग - व्दितीय, तडेगाव, जि.गोंदिया - तृतीय.

**राज्य पुरस्कृत आवास योजना -** अंबावडे, जि.पुणे - प्रथम, अणाव, जि.सिंधुदुर्ग - व्दितीय, बोरगाव, जि.चंद्रपूर - तृतीय.

### ५) सर्वोत्कृष्ट बहुमजली इमारती

**प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण -** करंजेपुल, जि.पुणे - प्रथम, देर्डे कोऱ्हाळे, जि.अहमदनगर - द्वितीय, निंभी खुर्द, जि.अकोला - तृतीय.

**राज्य पुरस्कृत आवास योजना -** चिंचवली, जि.ठाणे -प्रथम, शिरवली, जि.पुणे - द्वितीय, अंदूरा जि.अकोला - तृतीय.

### ६) सर्वोत्कृष्ट गृह संकुले

**प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण -** लोणी, जि.अहमदनगर - प्रथम, येडोळा, जि.उस्मानाबाद - द्वितीय, कणकापूर, जि.नाशिक - तृतीय.

**राज्य पुरस्कृत आवास योजना :-** खारेकर्दुणे, जि.अहमदनगर - प्रथम, अदासी, जि.गोंदिया - द्वितीय, मुणगे, जि.सिंधुदुर्ग - तृतीय.

या व्यतिरीक्त महा आवास अभियान-ग्रामीण २०२०-२१ मधील विशिष्ट १० उपक्रमांत संख्यात्मक प्रगतीनुसार उत्कृष्ट काम करणाऱ्या जिल्ह्यांना महा आवास अभियान विशेष पुरस्कार जाहीर केलेत.

### १) भूमीहीन लाभार्थ्यांना जागा उपलब्धता

**प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण -** जळगाव - प्रथम, अमरावती - द्वितीय, अहमदनगर - तृतीय.

**राज्य पुरस्कृत आवास योजना -** गोंदिया - प्रथम, बुलढाणा - द्वितीय, नाशिक - तृतीय.

### २) घरकुलांच्या उद्दिष्टांप्रमाणे मंजूरी

**प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण :-** गोंदिया - प्रथम, भंडारा - द्वितीय, अमरावती - तृतीय.

**राज्य पुरस्कृत आवास योजना -** उस्मानाबाद - प्रथम, नांदेड - द्वितीय, बीड - तृतीय.

### ३) मंजूर घरकुले पूर्ण

**प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण -** गोंदिया - प्रथम, नंदूरबार - द्वितीय, भंडारा - तृतीय.

**राज्य पुरस्कृत आवास योजना -** अहमदनगर - प्रथम, चंद्रपूर - व्दितीय, गोंदिया - तृतीय.

**४) बहुमजली इमारती उभारणी -** कोल्हापूर - प्रथम, सातारा - द्वितीय, बुलढाणा - तृतीय.

**५) गृह संकुले उभारणी -** वर्धा - प्रथम, सातारा - द्वितीय, गोंदिया - तृतीय.

**६) घरकुल मार्ट उभारणी -** अमरावती - प्रथम, गोंदिया - द्वितीय, भंडारा - तृतीय.

**७) लाभार्थ्यांना वित्तीय संस्थांचे गृहकर्ज उपलब्धता -** भंडारा - प्रथम, नांदेड - द्वितीय, सोलापूर - तृतीय.

**८) आदर्श घरांची निर्मिती -** औरंगाबाद - प्रथम, सातारा - द्वितीय, नांदेड - तृतीय.

**९) कॉर्पोरेट, स्वयंसेवी आणि सहकारी संस्थांचे सहकार्य -** पालघर - प्रथम, अहमदनगर - द्वितीय, सोलापूर - तृतीय.


## संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण यांच्या अध्यक्षतेखाली महा आवास अभियान २.० च्या क्षेत्रिय अंमलबजावणी यंत्रणेशी समन्वय बैठक

राज्यात महा आवास अभियान २.० च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सर्व क्षेत्रिय अंमलबजावणी यंत्रणेशी संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, डॉ. राजाराम दिघे यांच्या अध्यक्षतेखाली माहे एप्रिल ते जून २०२२ या कालावधीत विभाग, जिल्हा व तालुकानिहाय समन्वय बैठका दूरदृष्य प्रणालीव्दारे नियमित आयोजित करण्यात आल्या. या बैठकांना विभागीय आयुक्त कार्यालयाचे उपायुक्त (विकास), सहाय्यक आयुक्त (विकास), जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक, सर्व पंचायत समितीचे गट विकास अधिकारी व संबंधित अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

या बैठकीमध्ये महा आवास अभियान-ग्रामीण अंतर्गत विविध आवास योजनांच्या आर्थिक व भौतिक प्रगतीचा व अभियान कालावधीत राबवित असलेल्या १० उपक्रमांच्या प्रगतीचा आढावा घेण्यात आला. तसेच नावीन्यपूर्ण उपक्रम राबवून बहुमजली इमारती, गृहसंकुल, हाऊसिंग अपार्टमेंट, सॅण्ड बँक, लॅण्ड बँक व इतर विषयांवर आढावा घेण्यात आला. अभियान कालावधीत १० उपक्रमांवर लक्ष केंद्रीत करून जास्तीत जास्त घरकुलांचे बांधकाम करण्याच्या सूचना डॉ.राजाराम दिघे यांनी दिल्या.

दिनांक २० नोव्हेंबर २०२१ ते ३० जून २०२२ या कालावधीत महा आवास अभियान २.० मध्ये राबविण्यात आलेल्या उपक्रमांचे मूल्यमापन करून उत्कृष्ट काम करणाऱ्या संस्था व व्यक्तींना महा आवास अभियान पुरस्कार व महा आवास अभियान विशेष पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार असल्याचे डॉ.राजाराम दिघे यांनी सांगितले. त्यानुषंगाने सर्व स्तरावरील पुरस्कार मानांकने निवड व पुरस्कार वितरणासबंधी विविध मुद्यांवर चर्चा करण्यात आली.

ग्रामस्तरीय महा आवास अभियान पुरस्कार विजेत्यांना प्रदान करावयाचे मानचिन्ह व प्रशस्तीपत्राचे डिझाईन ग्रामस्तर, तालुकास्तर, जिल्हास्तर व विभागस्तरासाठी स्वतंत्रपणे पाठविण्यात येणार असल्याचे डॉ. राजाराम दिघे यांनी सांगितले. सर्व स्तरावरील पुरस्कार नामांकन निवड व पुरस्कार वितरण विहीत मुदतीत करण्याच्या सूचनाही संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, डॉ.राजाराम दिघे यांनी या समन्वय बैठकांच्या माध्यमातून सर्व क्षेत्रिय अंमलबजावणी यंत्रणेला केल्या.



## मा. केंद्रीय राज्यमंत्री, वस्त्रोद्योग व रेल्वे मंत्रालय यांचा घरकुल लाभार्थ्यांशी थेट संवाद

दिनांक १५ जून, २०२२ रोजी कोल्हापूर येथे मा. केंद्रीय राज्यमंत्री, वस्त्रोद्योग व रेल्वे मंत्रालय भारत सरकार, श्रीमती दर्शना जरदोष यांनी कोल्हापूर जिल्ह्यातील केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण मधील लाभार्थ्यांशी थेट संवाद साधला .

या कार्यक्रमासाठी मा. खासदार, श्री. धनंजय महाडिक, जिल्हाधिकारी श्री. राहुल रेखावार, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक डॉ. रवी शिवदास, पंचायत समिती कागलचे गट विकास अधिकारी श्री. करवीर इतर संबंधित अधिकारी, कर्मचारी व लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी मा. केंद्रीय राज्यमंत्री, श्रीमती दर्शना जरदोष यांनी घरकुल कसे, कुठे, कोणत्या स्वरूपाचे बांधले, किती अनुदान प्राप्त झाले. घरकुल पूर्ण झाल्यामुळे आपल्या जीवनमानात झालेला बदल, घरकुला सोबत इतर योजनांचा लाभ व इतर प्रश्नांवर लाभार्थ्यांशी थेट संवाद साधला.

कोल्हापूर जिल्ह्यातील आवास योजनेच्या कामाचे विशेष कौतुक करत, कोल्हापूर जिल्हा भौगोलिक दृष्ट्या सक्षम असून येथील लाभार्थी सुद्धा सर्व बाबतीत परिपूर्ण असल्याचे मनोगत मा. केंद्रीय राज्यमंत्री, वस्त्रोद्योग व रेल्वे मंत्रालय भारत सरकार, श्रीमती दर्शना जरदोष यांनी व्यक्त केले.



## आझादी का अमृत महोत्सव अंतर्गत अमृत घरकुल मोहिम

भारताच्या स्वातंत्र्यप्राप्तीस ७५ वर्षे पूर्ण होत असल्याचे औचित्य साधून केंद्र शासनाच्या वतीने देशभरात आझादी का अमृत महोत्सव अंतर्गत विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार यांचे सूचना अन्वये देशात १५ ऑगस्ट, २०२२ पर्यंत एकूण २.०२ कोटी घरकुले पूर्ण करण्याचे ध्येय असून, दिनांक १० मे, २०२२ ते १५ ऑगस्ट, २०२२ पर्यंत या कालावधीत संपूर्ण देशात ३७.५ लाख घरकुले पूर्ण करण्याचा केंद्र शासनाचा मानस आहे.

त्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्याला दिनांक १० मे, २०२२ ते १५ ऑगस्ट, २०२२ पर्यंत २.४० लाख घरकुले पूर्ण करण्याचे उद्दिष्ट देण्यात आले. दिनांक १० मे, २०२२ ते २८ जून, २०२२ पर्यंत केवळ २६ हजार घरकुले पूर्ण झाली असून उर्वरित २.१५ लाख घरकुले दिनांक १५ ऑगस्ट, २०२२ पर्यंत पूर्ण होणे आवश्यक आहे. त्याकरीता **दिनांक १ जुलै, २०२२ ते १५ ऑगस्ट, २०२२ या कालावधीत राज्यात 'अमृत घरकुल मोहिम' राबवून या कालावधीमध्ये प्रत्येक जिल्हयात दररोज किमान ७५ x २ = १५० घरकुले पूर्ण करण्याचे नियोजन व अंमलबजावणी करण्यात यावी.** यासाठी विभाग, जिल्हा, तालुका व ग्रामस्तरावर सदर मोहिम यशस्वी करणेसाठी पुढील प्रमाणे कार्यवाही अपेक्षित आहे.

१) दिनांक १५ जुलै, २०२२ पर्यंत मंजूरी न दिलेल्या घरकुलांना १००% मंजूरी देऊन पहिला हप्ता तात्काळ वितरीत करण्याची व घरकुले सुरु करणेची कार्यवाही करावी.

२) ज्या घरांचे बांधकाम Lintel level पर्यंत पूर्ण झाले आहे, अशी घरकुले दिनांक १५ जुलै, २०२२ पर्यंत पूर्ण करावीत.

३) ज्या घरांचे बांधकाम Plinth level पर्यंत पूर्ण झाले आहे, अशी घरकुले दिनांक १५ ऑगस्ट, २०२२ पर्यंत पूर्ण करावीत.

४) जिल्हयातील प्रलंबित घरकुलांचा आढावा घेऊन, जी घरे तात्काळ पूर्ण होऊ शकतील अशी घरकुले पूर्ण करावीत.

५) कामाची गती वाढविण्याच्या दृष्टीने लाभार्थ्याला बांधकाम साहित्य योग्य दरात व वेळेत उपलब्ध करुन देणेकरीता नियोजन करावे.

६) या मोहिमेमध्ये प्रत्येक ग्राम सेवक / ग्रामविकास अधिकाऱ्यास दररोजचे उद्दिष्ट देऊन जिल्हयाचे दररोजचे उद्दिष्ट पूर्ण करावे.

७) प्रत्येक ग्रामीण गृहनिर्माण अभियंत्यास दररोजचे उद्दिष्ट देऊन जिल्हयाचे दररोजचे उद्दिष्ट पूर्ण करणे.

८) गाव निहाय संपर्क अधिकाऱ्याची नेमणूक करुन त्यांनी लाभार्थी भेट करुन जिल्हयाचे दररोजचे उद्दिष्ट पूर्ण होण्याचे नियोजन करावे.

९) जिल्हयातील प्रत्येक तालुक्यास संपर्क अधिकारी नियुक्त करावा व त्यांच्या या मोहिमेच्या अंमलबजावणी संदर्भात तालुका भेटीचे नियोजन करावे.

१०) कार्यकारी अध्यक्ष, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी जिल्हयात दररोज ७५x२ = १५० घरे पूर्ण करण्याच्या दृष्टीने संबंधित यंत्रणेचा दैनंदिन आढावा घ्यावा.

११) उपायुक्त (विकास), विभागीय आयुक्त कार्यालय यांनी विभागातील जिल्हा निहाय दररोज किती उद्दिष्ट पूर्ण होत आहे याचा आढावा घ्यावा.

१२) विभागीय आयुक्त यांनी दर आठवडयाला उद्दिष्टानुसार विभागातील जिल्हयांत दररोज किती घरकुले पूर्ण होत आहेत याचा आढावा घ्यावा.

या माहिमेमध्ये दिनांक १ जुलै, २०२२ ते दिनांक १५ ऑगस्ट, २०२२ या कालावधीत सर्वात जास्त घरकुले पूर्ण करणाऱ्या राज्यातील प्रथम ३ क्रमांकाच्या विभागांना व राज्यातील प्रथम ५ क्रमांकाच्या जिल्हयांना यथोचित पुरस्काराने गौरविण्यात येईल.



# प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण
## संचित प्रगती अहवाल - ३० जून २०२२

| अ.क्र. | जिल्हा | उद्दिष्ट (PWL+Awaas+) | मंजूर | पूर्ण | % | राज्य रँक | राष्ट्रीय रँक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | गोंदिया | ९६०८४ | ८९०३४ | ७४९८३ | ८४.२२ | १ | २१४ |
| २ | नागपूर | ४१४९५ | ३४२६४ | २६२१६ | ७६.५१ | ३ | ५२५ |
| ३ | वर्धा | २०३१७ | १६१५४ | ११६८९ | ७२.३६ | ११ | ४५१ |
| ४ | भंडारा | ६५५०३ | ६०९०१ | ४०८१४ | ६७.०२ | १५ | ४३० |
| ५ | चंद्रपूर | ४४१४२ | ३७४४६ | २४६४३ | ६५.८१ | १७ | ३८५ |
| ६ | गडचिरोली | ३१६०० | ३०४५८ | १८२७६ | ६०.०० | २४ | ३९३ |
| | नागपूर विभाग | २९९१४१ | २६८२५७ | १९६६२१ | ७३.३० | १ | |
| ७ | रायगड | ९७९२ | ९७०१ | ७५६६ | ७७.९९ | २ | २४३ |
| ८ | सिंधुदुर्ग | ५२९६ | ४६९९ | ३५६३ | ७५.८२ | ४ | १९४ |
| ९ | ठाणे | ९५२७ | ८७२४ | ६४०० | ७३.३६ | ७ | १९१ |
| १० | पालघर | ३४८७६ | ३३६०३ | २४६१५ | ७३.२५ | ८ | २०४ |
| ११ | रत्नागिरी | १०२७७ | ८९३६ | ५७८० | ६४.६८ | १९ | १११ |
| | कोकण विभाग | ६९७६८ | ६५६६३ | ४७९२४ | ७२.९८ | २ | |
| १२ | नंदुरबार | ११९५८० | ११०७५३ | ८१९२८ | ७३.९७ | ६ | ३७६ |
| १३ | नाशिक | ९०३७९ | ८६७२६ | ६२७९८ | ७२.४१ | १० | २१९ |
| १४ | धुळे | ६४५३९ | ६१७०५ | ४०६८१ | ६५.९३ | १६ | २६७ |
| १५ | अहमदनगर | ६६११३ | ५४२०१ | ३५२८२ | ६५.०९ | १८ | ४९३ |
| १६ | जळगाव | ८२५३७ | ७४७८९ | ४४५४० | ५९.५५ | २५ | ५०९ |
| | नाशिक विभाग | ४२३१४८ | ३८८१७४ | २६५२२९ | ६८.३३ | ३ | |
| १७ | अकोला | ५१०२३ | ४१८९७ | ३१४३५ | ७५.०३ | ५ | ४८८ |
| १८ | अमरावती | ९८८२२ | ७९०७१ | ५७६४० | ७२.९० | ९ | ५२४ |
| १९ | बुलढाणा | ४६०५० | ३१०८५ | १९५२४ | ६२.८१ | २० | ४५७ |
| २० | यवतमाळ | ६५६७९ | ५०३२२ | २९८१३ | ५९.२४ | २६ | ३१० |
| २१ | वाशिम | २०६४२ | १३४८२ | ७१३५ | ५२.९२ | २७ | ४७२ |
| | अमरावती विभाग | २८२२१६ | २१५८५७ | १४५५४७ | ६७.४३ | ४ | |
| २२ | कोल्हापूर | १७९९२ | १६६९३ | ११३४४ | ६७.९६ | १२ | २९५ |
| २३ | सोलापूर | ५३९८९ | ४२२१० | २८४७८ | ६७.४७ | १३ | ४७१ |
| २४ | पुणे | २२७५६ | १७७४४ | ११९३२ | ६७.२५ | १४ | ५०३ |
| २५ | सातारा | १७७१४ | १४०५१ | ८६६६ | ६१.६८ | २१ | ५०६ |
| २६ | सांगली | २३५५२ | १९७१७ | १२०३३ | ६१.०३ | २२ | ५३० |
| | पुणे विभाग | १३६००३ | ११०४१५ | ७२४५३ | ६५.६२ | ५ | |
| २७ | हिंगोली | १८१७८ | १३९१६ | ८४१७ | ६०.४८ | २३ | २८५ |
| २८ | जालना | २४७२८ | १७९८४ | ९३४५ | ५१.९६ | २८ | ४८४ |
| २९ | औरंगाबाद | ३६९०७ | ३३८५३ | १७४०८ | ५१.४२ | २९ | ३१९ |
| ३० | नांदेड | ६९९४४ | ६००२३ | ३०१०८ | ५०.१६ | ३० | ५१६ |
| ३१ | बीड | ३५४३६ | २८९८७ | १४२३७ | ४९.१२ | ३१ | ४१४ |
| ३२ | लातूर | २१२५५ | १६८१८ | ७८६६ | ४६.७७ | ३२ | ४३३ |
| ३३ | परभणी | १९२४९ | १२४६५ | ५७२९ | ४५.९६ | ३३ | १७४ |
| ३४ | उस्मानाबाद | १४८०७ | १०२१९ | ४३७८ | ४२.८४ | ३४ | २७७ |
| | औरंगाबाद विभाग | २४०५०४ | १९४२६५ | ९७४८८ | ५०.१८ | ६ | |
| | एकूण | १४५०७८० | १२४२६३१ | ८२५२६२ | ६६.४१ | | |

# रमाई आवास योजना
## संचित प्रगती अहवाल - ३० जून २०२२

| अ.क्र. | जिल्हा | उद्दिष्ट | मंजूर | पूर्ण | % | राज्य रँक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | सिंधुदुर्ग | २०३१ | २०१५ | १६४९ | ८१.८ | ५ |
| २ | रत्नागिरी | ६६८४ | ६०८८ | ५३१४ | ८७.३ | १ |
| ३ | ठाणे | १२५६ | १०१७ | ८८७ | ८७.२ | २ |
| ४ | पालघर | ४९८ | ४५४ | ३४४ | ७५.८ | १४ |
| ५ | रायगड | २०३९ | २०२७ | १५०३ | ७४.१ | १७ |
| | कोकण विभाग | १२५०८ | ११६०१ | ९६९७ | ८३.६ | १ |
| ६ | नागपूर | ८०३९ | ७२५७ | ६२६१ | ८६.२८ | ३ |
| ७ | गोंदिया | १०१२७ | ९०३६ | ६७२० | ७४.३७ | १६ |
| ८ | वर्धा | ७५०९ | ७४२० | ४८६५ | ६५.५७ | २५ |
| ९ | भंडारा | १२४८० | १०६७४ | ८४२३ | ७८.९१ | ९ |
| १० | गडचिरोली | ६८८० | ५७८७ | ४५११ | ७७.९५ | १० |
| ११ | चंद्रपूर | २२८७३ | १६८७६ | ११९४७ | ६६.०५ | २४ |
| | नागपूर विभाग | ६७९०८ | ५७०५० | ४१९२७ | ७३.४९ | २ |
| १२ | सोलापूर | १७६८९ | १७५४८ | १२५०८ | ७१.२८ | २० |
| १३ | सातारा | १०३२८ | १०३२२ | ८१६४ | ७९.०९ | ८ |
| १४ | कोल्हापूर | १२४४३ | १२४४३ | ९६६८ | ७७.७० | ११ |
| १५ | सांगली | ८६१४ | ८१८४ | ५७४८ | ७०.२३ | २१ |
| १६ | पुणे | ९५१७ | ९४२५ | ६३३० | ६७.१६ | २२ |
| | पुणे विभाग | ५८५९१ | ५७९२२ | ४२४१८ | ७३.२३ | ३ |
| १७ | धुळे | ८५४९ | ७१८९ | ४६८२ | ६५.१३ | २६ |
| १८ | अहमदनगर | २८४३४ | २७७१४ | २०४५६ | ७३.८१ | १८ |
| १९ | नाशिक | १२३३८ | ९१५४ | ७४८१ | ८१.७२ | ६ |
| २० | जळगाव | १६७५८ | १४९५४ | १००३८ | ६७.१३ | २३ |
| २१ | नंदुरबार | ३५२२ | २९२८ | १८३० | ६२.५० | ३० |
| | नाशिक विभाग | ६९६०१ | ६१९३९ | ४४४८७ | ७१.८२ | ४ |
| २२ | अमरावती | १४९३७ | ११११९६ | ८५४४ | ७६.३१ | १३ |
| २३ | यवतमाळ | १४३४१ | १२९२१ | ९६१२ | ७४.३९ | १५ |
| २४ | अकोला | १८०९२ | १४२२० | ९२५४ | ६५.०८ | २७ |
| २५ | वाशिम | ९१६६ | ८१०५ | ५०९९ | ६२.९१ | २९ |
| २६ | बुलढाणा | १८५५४ | १६९१८ | ८९७३ | ५३.०४ | ३३ |
| | अमरावती विभाग | ७५०९० | ६३३६० | ४१४८२ | ६५.४७ | ५ |
| २७ | परभणी | १६८४१ | १४४७० | ११६२३ | ८०.३२ | ७ |
| २८ | हिंगोली | ९९२८ | ६५७६ | ५४८० | ८३.३३ | ४ |
| २९ | लातूर | २६२४२ | १९०८७ | १४६८१ | ७६.९२ | १२ |
| ३० | औरंगाबाद | २२२३३ | १५२४१ | १०९३९ | ७१.७७ | १९ |
| ३१ | बीड | २५७३५ | १५९७८ | १००६४ | ६२.९९ | २८ |
| ३२ | जालना | १९२४६ | १४५७२ | ५३४७ | ३६.६९ | ३४ |
| ३३ | नांदेड | २१३०० | १४९७९ | ८६८१ | ५७.९५ | ३१ |
| ३४ | उस्मानाबाद | २३६६४ | १४४४७ | ७९२५ | ५४.८६ | ३२ |
| | औरंगाबाद विभाग | १६५१८९ | ११५३५० | ७४७४० | ६४.७९ | ६ |
| | एकूण | ४४८८८७ | ३६७२२२ | २५४७५१ | ६९.३७ | |

# शबरी आवास योजना
## संचित प्रगती अहवाल - ३० जून २०२२

| अ.क्र. | जिल्हा | उद्दिष्ट | मंजूर | पूर्ण | % | राज्य रँक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | कोल्हापूर | ३० | १३ | १३ | १००.०० | १ |
| 2 | सोलापूर | ६८५ | ६२६ | ५३६ | ८५.६२ | ५ |
| ३ | सांगली | ६० | ५० | ४१ | ८२.०० | ८ |
| ४ | पुणे | २६७२ | २६५७ | २१६८ | ८१.६० | ९ |
| ५ | सातारा | १६७ | १३० | १०५ | ८०.७७ | १२ |
| | पुणे विभाग | ३६१४ | ३४७६ | २८६३ | ८२.३६ | १ |
| ६ | हिंगोली | ३४३२ | ३०६५ | २७१० | ८८.४२ | ३ |
| ७ | जालना | ५६४ | ४४६ | ३८१ | ८५.४३ | ६ |
| ८ | लातूर | ६९० | ४५६ | ३८४ | ८४.२१ | ७ |
| ९ | औरंगाबाद | २५३९ | २२८६ | १८०८ | ७९.०९ | १३ |
| १० | नांदेड | १४९१ | १०४८ | ८१५ | ७७.७७ | १५ |
| ११ | परभणी | ७५२ | ७४१ | ५३० | ७१.५२ | २५ |
| १२ | बीड | ६५८ | ४५७ | ३१५ | ६८.९३ | २७ |
| १३ | उस्मानाबाद | २९३ | २४९ | १४२ | ५७.०३ | ३२ |
| | औरंगाबाद विभाग | १०४१९ | ८७४८ | ७०८५ | ८०.९९ | २ |
| १४ | सिंधुदुर्ग | २३ | २३ | २३ | १००.०० | २ |
| १५ | ठाणे | १८८२ | १८६५ | १६१९ | ८६.८१ | ४ |
| १६ | रायगड | १७७० | १७६७ | १४३७ | ८१.३२ | १० |
| १७ | रत्नागिरी | २३८ | २३२ | १७६ | ७५.८६ | १९ |
| १८ | पालघर | ७१२५ | ७११९ | ५१२८ | ७२.०३ | २४ |
| | कोकण विभाग | ११०३८ | ११००६ | ८३८३ | ७६.१७ | ३ |
| १९ | अहमदनगर | ३८४६ | ३८३९ | ३०२१ | ७८.६९ | १४ |
| २० | नाशिक | १०९४० | १०९१२ | ८४०० | ७६.९८ | १७ |
| २१ | जळगाव | ५२८९ | ५२७५ | ४०४९ | ७६.७६ | १८ |
| २२ | धुळे | ७८६० | ७८३२ | ५८८६ | ७५.१५ | २० |
| २३ | नंदुरबार | १०८५२ | १०४२६ | ६६११ | ६३.४१ | ३० |
| | नाशिक विभाग | ३८७८७ | ३८२८४ | २७९६७ | ७३.०५ | ४ |
| २४ | अमरावती | ४३५९ | ४१०४ | ३०७३ | ७४.८८ | २१ |
| २५ | बुलढाणा | ११३६ | १०८७ | ७८३ | ७२.०३ | २३ |
| २६ | यवतमाळ | ५५७२ | ५५३८ | ३९२० | ७०.७८ | २६ |
| २७ | अकोला | १६८२ | १२७१ | ८२६ | ६४.९९ | २९ |
| २८ | वाशिम | ८०१ | ७६८ | ३८० | ४९.४८ | ३४ |
| | अमरावती विभाग | १३५५० | १२७६८ | ८९८२ | ७०.३५ | ५ |
| २९ | वर्धा | २८०२ | २७९९ | २२७१ | ८१.१४ | ११ |
| ३० | नागपूर | २६१८ | २५८६ | २००७ | ७७.६१ | १६ |
| ३१ | चंद्रपूर | ६०१६ | ५४७१ | ४०७७ | ७४.५२ | २२ |
| ३२ | गोंदिया | २५९९ | २३९४ | १५६८ | ६५.५० | २८ |
| ३३ | भंडारा | ४६६१ | ४४२८ | २८०७ | ६३.३९ | ३१ |
| ३४ | गडचिरोली | ५७३५ | ५४१४ | ३०१० | ५५.६० | ३३ |
| | नागपूर विभाग | २४४३१ | २३०९२ | १५७४० | ६८.१६ | ६ |
| | एकूण | १०१८३९ | ९७३७४ | ७१०२० | ७२.९४ | |

# पारधी आवास योजना
## संचित प्रगती अहवाल - ३० जून २०२२

| अ.क्र. | जिल्हा | उद्दिष्ट | मंजूर | पूर्ण | % | राज्य रँक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | वर्धा | ५० | ५० | ४६ | ९२.० | १० |
| २ | चंद्रपूर | ३५ | १९ | १७ | ८९.५ | १२ |
| ३ | नागपूर | ४८ | ४८ | ३८ | ७९.२ | १८ |
| नागपूर विभाग | | १३३ | ११७ | १०१ | ८६.३ | १ |
| ४ | कोल्हापूर | ७ | ७ | ७ | १००.० | २ |
| ५ | सोलापूर | २३१ | २०२ | १९२ | ९५.० | ७ |
| ६ | सांगली | ३८ | २४ | २१ | ८७.५ | १५ |
| ७ | सातारा | २४ | २४ | १९ | ७९.२ | १९ |
| ८ | पुणे | १८८ | १५९ | ११७ | ७३.६ | २० |
| पुणे विभाग | | ४८८ | ४१६ | ३५६ | ८५.६ | २ |
| ९ | हिंगोली | ३५ | ३५ | ३५ | १००.० | १ |
| १० | लातूर | १७ | १३ | १३ | १००.० | ३ |
| ११ | नांदेड | ५० | ४२ | ४२ | १००.० | ४ |
| १२ | परभणी | ५६ | ५६ | ५४ | ९६.४ | ६ |
| १३ | बीड | ९२ | ८६ | ७६ | ८८.४ | १३ |
| १४ | उस्मानाबाद | २४७ | २४७ | १९७ | ७९.८ | १७ |
| १५ | औरंगाबाद | ५७ | ५१ | ३६ | ७०.६ | २१ |
| १६ | जालना | ३८ | ३२ | १९ | ५९.४ | २४ |
| औरंगाबाद विभाग | | ५९२ | ५६२ | ४७२ | ८४.० | ३ |
| १७ | वाशिम | ६४ | ६४ | ६२ | ९६.९ | ५ |
| १८ | बुलढाणा | ३७१ | ३७१ | ३४४ | ९२.७ | ९ |
| १९ | अमरावती | ४५१ | ४४४ | ४०१ | ९०.३ | ११ |
| २० | अकोला | ३७४ | ३७३ | ३२८ | ८७.९ | १४ |
| २१ | यवतमाळ | ५९४ | ५९१ | ४०६ | ६८.७ | २२ |
| अमरावती विभाग | | १८५४ | १८४३ | १५४१ | ८३.६ | ४ |
| २२ | धुळे | ४३२ | ४३२ | ४०९ | ९४.७ | ८ |
| २३ | अहमदनगर | १९८ | १९८ | १७० | ८५.९ | १६ |
| २४ | जळगाव | ५७० | ५६० | ३४५ | ६१.६ | २३ |
| २५ | नाशिक | १४३ | १३७ | ७० | ५१.१ | २५ |
| २६ | नंदुरबार | १० | ० | ० | ०.० | २६ |
| नाशिक विभाग | | १३५३ | १३२७ | ९९४ | ७४.९ | ५ |
| एकूण | | ४४२० | ४२६५ | ३४६४ | ८१.२१९२ | |

# आदिम आवास योजना

## संचित प्रगती अहवाल - ३० जून २०२२

| अ.क्र. | जिल्हा | उद्दिष्ट | मंजूर | पूर्ण | % | राज्य रँक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | नाशिक | ९८ | १२ | १२ | १००.० | १ |
| नाशिक विभाग | | ९८ | १२ | १२ | १००.० | १ |
| २ | गडचिरोली | १७७८ | १६५१ | ११९६ | ७२.४ | ३ |
| ३ | चंद्रपूर | ७२३ | ३८४ | २३६ | ६१.५ | ५ |
| ४ | वर्धा | ३९६ | २०० | २६ | १३.० | १० |
| नागपूर विभाग | | २८९७ | २२३५ | १४५८ | ६५.२ | २ |
| ५ | सिंधुदुर्ग | ६६ | ४९ | ४८ | ९८.० | २ |
| ६ | रायगड | १३९४ | १३८९ | ८८७ | ६३.९ | ४ |
| ७ | ठाणे | १५७८ | १३६६ | ८३१ | ६०.८ | ६ |
| ८ | पालघर | ११३१ | ११२३ | ५५९ | ४९.८ | ९ |
| ९ | रत्नागिरी | ८ | ५ | ० | ०.० | १२ |
| कोकण विभाग | | ४१७७ | ३९३२ | २३२५ | ५९.१ | ३ |
| १० | यवतमाळ | ४७८४ | २०३३ | ११३६ | ५५.९ | ७ |
| अमरावती विभाग | | ४७८४ | २०३३ | ११३६ | ५५.९ | ४ |
| ११ | नांदेड | ४१९ | १८१ | ९८ | ५४.१ | ८ |
| औरंगाबाद विभाग | | ४१९ | १८१ | ९८ | ५४.१ | ५ |
| १२ | पुणे | ७५ | १९ | ० | ०.० | ११ |
| पुणे विभाग | | ७५ | १९ | ० | ०.० | ६ |
| एकूण | | १२४५० | ८४१२ | ५०२९ | ५९.८ | |

# यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना

## संचित प्रगती अहवाल - ३० जून २०२२

| अ.क्र. | जिल्हा | उद्दिष्ट | मंजूर | पूर्ण | % | राज्य रँक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | गोंदिया | २० | २० | २० | १००.० | १ |
| नागपूर विभाग | | २० | २० | २० | १०० | १ |
| २ | सोलापूर | ४ | ४ | ३ | ७५.० | २ |
| पुणे विभाग | | ४ | ४ | ३ | ७५ | २ |
| ३ | लातूर | १० | १० | ७ | ७०.० | ३ |
| ४ | उस्मानाबाद | ३६७ | ३२१ | १६३ | ५०.८ | ४ |
| औरंगाबाद विभाग | | ३७७ | ३३१ | १७० | ५१.३६ | ३ |
| ५ | अमरावती | ४५ | ४५ | २० | ४४.४ | ५ |
| ६ | यवतमाळ | १४० | १२९ | २० | १५.५ | ६ |
| अमरावती विभाग | | १८५ | १७४ | ४० | २३.० | ४ |
| ७ | अहमदनगर | २० | ० | ० | ०.० | ७ |
| नाशिक विभाग | | २० | ० | ० | ०.० | ५ |
| एकूण | | ६०६ | ५२९ | २३३ | ४४.० | |

# ८० दिवसात घरकुल बांधकाम पूर्ण

श्रीमती सुशीला घनश्याम आत्राम ग्रामपंचायत साखरा तालुका समुद्रपूर जिल्हा वर्धा येथील रहीवाशी आहेत. साखरा या गावामध्ये श्रीमती सुशीला घनश्याम आत्राम कुडा मातीच्या, मोडकळीस आलेल्या घरात आपल्या मुला सोबत राहत होत्या. त्यांचे पतीचे निधन झाल्याने त्यांच्या घरची आर्थिक परिस्थिती हलाखीची होती. त्यांचे राहते घर मातीचे असल्याने इतके जिर्ण झाले होते की, पावसाळ्याच्या दिवसात भिंती पडायची भिती होती. आधीच कच्चे घर त्यात पावसाळ्यात संपूर्ण घरात पाणी शिरत असल्याने घरात राहणे कठीण झाले होते. अशा श्रीमती सुशीला घनश्याम आत्राम यांचा मुलगा लग्नाचा होता. परंतु घराची दुर्दशा पाहून कोणीही मुलगी द्यायला तयार नव्हते. पक्के नसल्याने मुलाचे लग्न होणार की नाही याची चिंता श्रीमती सुशीला घनश्याम आत्राम यांना लागली होती.

अशातच सन २०२१-२२ प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीणचे समुद्रपुर तालुक्याला उद्दिष्ट प्राप्त झाले असून यामध्ये ग्रामपंचायत साखरा यांना १६ लाभार्थीचे उद्दिष्ट प्राप्त झाले. यामध्ये एस. टी. प्रवर्गातून १० नंबरला श्रीमती सुशीला घनश्याम आत्राम यांचे नाव पात्र यादीत होते. त्यामुळे त्यांना लागलेली मुलाच्या लग्नाची चिंता काहीशी दूर होतांना दिसत होती. तसेच कित्येक वर्षापासून मनी बाळगलेले पक्क्या घराचे स्वप्न पूर्ण होतांना दिसत होते. ग्रामपंचायत साखरा कडून श्रीमती सुशीला घनश्याम आत्राम यांचा घरकुलाचा प्रस्ताव तयार करून पंचायत समिती समुद्रपूरला पाठवून करारनामा करण्यात आला. श्रीमती सुशीला घनश्याम आत्राम यांचे घरकुल मंजूर होताच पंचायत समिती स्तरावरून विनाविलंब पहिला हफ्ता रक्कम रू. १५,०००/- त्यांच्या बँक खाती जमा करण्यात आला.

श्रीमती सुशीला घनश्याम आत्राम यांना मिळालेल्या रक्कमेतून त्यांनी घरकुल बांधकामास सुरुवात केली. घरकुलाचे काम जोत्यापर्यंत आल्यावर बांधकामाचे फोटो काढून ग्रामपंचायतीने दुसरा हफ्ता मागणी प्रस्ताव पंचायत समितीकडे सादर केला. त्यानंतर ग्रामीण गृहनिर्माण अभियंता श्री. आशिष पांडे यांनी घरकुल बांधकामाची तपासणी करून दुसरा हफ्ता रक्कम रू. ४५,०००/- रु. श्रीमती सुशीला घनश्याम आत्राम यांच्या बँक खाती जमा केला. यासोबतच मनरेगा अंतर्गत मजूरीचे मस्टर रोजगार सेवक यांनी श्रीमती सुशीला घनश्याम आत्राम यांना काढून दिले. घरकुलाचे बांधकाम लिंटेल लेव्हलवर आल्यावर तीसरा हफ्ता रक्कम रू. ४०,०००/- त्यांना प्राप्त झाला. त्यानंतर त्यांनी घरकुलाचे छतापर्यंत बांधकाम पूर्ण केले. आर्थिक परिस्थिती बेताची असल्याने घरावर स्लॅब टाकणे आवाक्या बाहेरचे होते. त्यामुळे जेमतेम परिस्थितीत घरावर पत्रे टाकून शौचालयासह घरकुलाचे पक्के बांधकाम पूर्ण केले. पंचायत समिती समुद्रपुर येथे शौचालयासह घरकुलाचे फोटो केल्यावर अंतिम हफ्ता रक्कम रू. २०,०००/- श्रीमती सुशीला घनश्याम आत्राम यांच्या बँक खाती जमा करण्यात आला.

श्रीमती सुशीला घनश्याम आत्राम यांना प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण मधून रक्कम रू.१,२०,०००/- व रोजगार हमी योजने मधून रक्कम रू.१८,०००/- अनुदान मिळाले. शासनाकडून वेळेत निधी व वेळोवेळी सहकार्य मिळाल्याने श्रीमती सुशीला घनश्याम आत्राम यांनी अवघ्या ८० दिवसात त्यांचे घरकुल बांधकाम पूर्ण केले. घरकुलासोबतच त्यांना रोजगार, शौचालय, गॅस जोडणी, वीज जोडणी व नळ जोडणी मिळाल्याने माझे जीवनमान उंचावले असून मी आनंदी आहे. याकरीता मी शासनाचे खुप खुप आभारी असल्याची प्रतिक्रीया श्रीमती सुशीला घनश्याम आत्राम यांनी व्यक्त केली.





# कमी कालावधीत दर्जेदार डेमो हाऊसची निर्मिती

अकोला हे महाराष्ट्राच्या उत्तर भागातील विदर्भातले शहर असून जिल्हा मुख्यालयाचे ठिकाण आहे. अकोला हे शहर मोर्णा नदीच्या काठावर वसलेले असून येथील लोकांचा मुख्य व्यवसाय शेती आहे. तसेच अकोला हे शहर डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ यामुळे देखील ओळखल्या जाते. या शहरामध्ये रेल्वे स्टेशन जं. व शहरातून राष्ट्रीय महामार्ग क्र.६ जातो. अकोला जिल्ह्यात अकोला, बाळापूर, पातूर, बार्शीटाकळी, मुर्तीजापूर, अकोट व तेल्हारा अशी एकुण ७ तालुके आहेत. त्यापैकी एक बाळापूर तालुका हा मान आणि महिषा या दोन नद्यांच्या संगमावर वसलेला तालुका आहे. या तालुक्याचे वैशिष्ट्य म्हणजे येथे एक ऐतिहासिक अष्टकोश किल्ला असून याच किल्ल्यावर बाळापूर पंचायत समिती कार्यालय आहे.

राज्यात घरकुलांची गुणवत्ता सुधारण्यासाठी व लाभार्थ्यांना मार्गदर्शक ठरण्यासाठी प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत प्रत्येक पंचायत समिती आवारात तालुकास्तरीय डेमो हाऊस निर्मिती करण्याचे उद्दिष्ट शासनाने निश्चित केले होते. याकरीता महा आवास अभियान-ग्रामीण अंतर्गत डेमो हाऊसची निर्मिती करण्यासाठी उपक्रमही राबविण्यात आला. यामुळे राज्यात जवळ जवळ सर्वच पंचायत समिती आवारामध्ये डेमो हाऊसची निर्मिती करण्यात आली. परंतु पंचायत समिती बाळापूर आवारात डेमो हाऊस बांधकामासाठी जागा उपलब्ध होत नव्हती. याबाबत पंचायत समिती बाळापूरचे गट विकास अधिकारी श्री.अक्षय सुक्रे यांनी जिल्हा परिषद व जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या वरीष्ठ अधिकाऱ्यांशी चर्चा केली. त्यानुसार अकोला जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. सौरभ कटियार व जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक श्री. सुरज गोहाड यांच्या मार्गदर्शन व सहकार्यातून ग्रामपंचायत शेळद येथे बाळापूर तालुकास्तरीय डेमो हाऊस बांधकामासाठी जागा उपलब्ध करून देण्यात आली. याकामी ग्रामपंचायत शेळदचे सरपंच श्री. सागर उपर्वट, ग्रामसेवक श्री. पि. एस. नृपनारायण व ग्रामपंचायत सदस्य श्री. योगेश कोकाटे यांनी विशेष सहकार्य केले.

बाळापूर तालुकास्तरीय डेमो हाऊस बांधकामासाठी जागा निश्चिती बरोबर गट विकास अधिकारी श्री. अक्षय सुक्रे, विस्तार अधिकारी श्री.नाखट, पंचायत समिती बाळापूरचे सबंधित अधिकारी/कर्मचारी, सरपंच श्री. सागर उपर्वट, सर्व ग्रामपंचायत सदस्य, घरकुल लाभार्थी व ग्रामस्थ यांच्या उपस्थितीत भूमीपूजन करण्यात आले. पंचायत समिती बाळापूरचे अभियंता श्री. राठोड यांचे मार्गदर्शनाखाली बाळापूरचे तालुकास्तरीय डेमो हाऊस १३ ते १५ दिवसात रंगरंगोटी व परिसरात वृक्षारोपणासह पूर्ण करण्यात आले. हे डेमो हाऊस अत्यंत अल्प कालावधीत व कमी खर्चात बांधले असून बाळापूर तालुक्यातील ६६ ग्रामपंचायतींकरिता एक आदर्श ठरला आहे. या डेमो हाऊसचे जिल्हा, तालुका तसेच गाव पातळीवर सर्वत्र कौतुक होत आहे.

या डेमो हाऊसचे लोकार्पण जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. सौरभ कटियार यांच्या हस्ते व अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.पवार, प्रकल्प संचालक श्री. सुरज गोहाड, गट विकास अधिकारी श्री. अक्षय सुक्रे, विस्तार अधिकारी श्री.नाखट, पंचायत समितीचे अधिकारी/कर्मचारी, ग्रामपंचायत शेळदचे सरपंच श्री. सागर उपर्वट, उप सरपंच जितेश अहिर , ग्रामसेवक श्री. पि. एस. नृपनारायण, ग्रामपंचायत सदस्य श्री. योगेश कोकाटे, ग्रामपंचायत सदस्या सौ. बेबीताई इंगळे, ग्रामीण गृहनिर्माण अभियंता श्री. पवन म्हातारमरे , श्री.निखिल गव्हाणकर यासोबतच समस्त गावकरी उपस्थित होते.






# रमाई आवास योजनेमुळे मिळाले पक्के घरकुल

अंजी ग्रामपंचायत नांदेड जिल्ह्यातील किनवट तालुक्यामध्ये असून या गावामध्ये श्री.माणीकराव सटवा सलाम राहत होते. यापूर्वीचे त्यांचे माती व पत्राचे साधे घर होते. त्यामुळे पावसाळयात घरात पाणी गळत होते. वादळवारे सुटल्यानंतर घरावर छप्पर राहते की नाही अशी कायम मनात भिती निर्माण व्हावयाची. त्यांना पक्के घर बांधायची भरपूर इच्छा होती. परंतु आयुष्यामध्ये त्यांचे पक्क्या घराचे स्वप्न पुर्ण होणार किंवा नाही याबाबत नेहमी त्यांच्या मनात शंका निर्माण होत होती.

श्री. माणीकराव सटवा सलाम यांनी एक दिवस थेट ग्रामपंचायत कार्यालय गाठले आणि गावामध्ये इतर लोकांना शासनाकडून घरकुलाचा लाभ मिळतो आहे. तसा मलाही मिळेल का? याकरीता नियम, अटी व शर्ती काय आहेत? याबाबत ग्रामसेवक श्री. एस. एम. बिसर्मिले यांच्याकडे चौकशी केली. त्यानुसार ग्रामसेवकांनी श्री. माणीकराव सटवा सलाम यांना रमाई आवास योजने विषयी सविस्तर माहिती दिली. तसेच तुम्हाला या योजने अंतर्गत घरकुल मिळू शकते असे सांगितले. याकरीता लागणारे कागदपत्राची यादी ग्रामसेवक श्री. एस. एम. बिसर्मिले यांनी श्री. माणीकराव सटवा सलाम यांना देवून कागदपत्राची पुर्तता करण्याचे सांगितले. त्यानुसार श्री. माणीकराव सटवा सलाम यांनी सर्व कागदपत्राची जुळवा जुळव करून ग्रामपंचायत कार्यालयात जमा केली. ग्रामपंचायतीने ग्रामसभेचा ठराव घेऊन श्री. माणीकराव सटवा सलाम यांना रमाई आवास योजना अंतर्गत सन २०१९-२० या वर्षात घरकुल मंजूरीचा ठराव व प्रस्ताव वरीष्ठ कार्यालयाकडे सादर केला. वरीष्ठ कार्यालयाकडून घरकुल मंजूर झाल्याचे कळल्यावर श्री. माणीकराव सटवा सलाम यांना खुप आनंद झाला.

पंचायत समिती किनवट येथे श्री. नासीर बेग, डाटा एन्ट्री ऑपरेटर यांनी सांगितलेली कागदपत्रे आधार कार्ड, नमुना नंबर ८, बॅक पासबुक, जॉबकार्ड इत्यादीची पुर्तता श्री. माणीकराव सटवा सलाम यांनी पंचायत समितीस्तरावर केली. त्यानुसार गटविकास अधिकारी, पंचायत समिती किनवट यांच्यामार्फत घरकुल मंजूर करून पहिला हप्ता श्री. माणीकराव सटवा सलाम यांच्या बँक खात्यामध्ये अग्रीम स्वरूपात तात्काळ जमा करण्यात आला. पहिल्या हप्त्याची रक्कम मिळताच श्री. माणीकराव सटवा सलाम यांनी विनाविलंब घरकुलाच्या बांधकामास सुरूवात केली. घरकुल बांधकामाच्या टप्प्यानुसार पंचायत समिती स्तरावरून त्यांना सर्व हप्ते वेळेत दिले. त्यामुळे त्यांचे पक्क्या घराचे स्वप्न लवकरच पूर्ण झाले. त्यांचे घरकुलाचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक, अभियंता, ग्रामसेवक, ग्रामरोजगार सेवक व ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांनी वेळोवळी मार्गदर्शन व सहकार्य केले.

श्री. माणीकराव सटवा सलाम यांना घरकुल बांधकामासाठी रमाई आवास योजने मधून रक्कम रूपये १,२०,०००/- मिळाले. त्यासोबतच इतर शासकीय योजनांच्या कृतीसंगमातून स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) मधून शौचालयासाठी रूपये १२,०००/- व मनरेगा मधून रूपये १८,०००/- मिळाले.

माझे घरकुल पुर्ण झाल्यामुळे मी आता खुप आनंदी व समाधानी आहे. पावसाळयामध्ये वादळवारा सुटल्यास तरी आता मला भिती वाटत नाही. प्रधानमंत्री उज्वला योजने मधून मला गॅस मिळाल्याने स्वयंपाक करण्यासाठी जास्त वेळ लागत नाही. यापुर्वी पावसाळ्यात लाकड ओली असायची त्यामुळे तासंतास चूल पेटत नव्हती. त्यातच डोळ्यात धुर जाणे त्यामुळे डोळ्यांची जळजळ व्हायची. आता यापासुन माझी व माझ्या परिवाराची सुटका झाली आहे. तसेच मला जल जीवन मिशन मधुन नळाने पाणी, सौभाग्य योजने मधुन विद्युत जोडणी, व राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियान मधुन उपजिविकेचे साधन मिळाले आहे. शासनाच्या रमाई आवास योजनेमुळे आज माझे स्वतःच्या पक्क्या घराचे स्वप्न पूर्ण झाले आहे. माझे घरकुल पूर्ण करण्यासाठी ज्यांनी मला सहकार्य केले त्यांचा व शासकीय यंत्रणेचा मी सदैव ऋणी राहिल.



# महा आवास अभियानामुळे अल्प कालावधीत घर पूर्ण

जळगांव बु. ग्रामपंचायत नाशिक जिल्ह्यातील नांदगाव तालुक्यात आहे. या ग्रामपंचायतीमध्ये श्री. सोमनाथ हरि मेंगाळ त्यांच्या कुटुंबासह माती व पत्र्याच्या अत्यंत जिर्ण झालेल्या कच्च्या घरात राहात होते. पावसाळ्यात घराचे छप्पर गळत तर होते त्यासोबतच घरात पाणीही शिरत होते. त्यामुळे त्यांच्या कुटूंबाला झोपण्यासाठी जागा नसायची. त्यांचे घर जंगल वस्तीत असल्याने साप, विंचु, विषारी किटक यापासुन त्यांना व त्यांच्या कुटूंबाला नेहमी धोका असल्याने त्यांना असुरक्षितता निर्माण झाली होती. पावसाळा व उन्हाळ्यात त्यांच्या शेतात केलेल्या बोअरवरून पिण्याचे व वापरायचे पाणी उपलब्ध व्हायचे, परंतु उन्हाळ्यात बोअरलाच पाणी उपलब्ध नसायचे त्यामुळे वापरायचे तर सोडा पिण्याच्या पाण्याचा मोठा प्रश्न त्यांच्यापुढे उभा राहत होता. या सर्व त्रासातून सुटकेसाठी श्री. सोमनाथ हरि मेंगाळ व त्यांचे कुटुंब नेहमी देवाकडे प्रार्थना करत होते.

अशातच राज्यात महा आवास अभियान २.० अंतर्गत श्री. सोमनाथ हरि मेंगाळ यांना प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण सन २०२१-२२ मध्ये घरकुल मंजूर झाले. हि बातमी त्यांना कळताच त्यांना व त्यांच्या कुटुंबातील सर्व सदस्यांना खुप आनंद झाला. देव रूपाने शासनाचे महा आवास अभियान २.० मदतीला धावून आल्याची प्रतिक्रीया श्री. सोमनाथ हरि मेंगाळ यांनी व्यक्त केली. घरकुल मंजूर होताच त्यांना घरकुलाचा पहिला हप्ता त्यांच्या बँक खाती जमा करण्यात आला. त्यांनी जराही वेळ न गमावता घरकुल बांधकामाला सुरूवात केली. बांधकामाच्या टप्प्यानुसार त्यांना घरकुलाचे सर्व हप्ते त्वरीत मिळाल्याने अत्यंत अल्प कालावधीत घरकुलाचे बांधकाम पूर्ण झाले. यामुळे महा आवास अभियान २.० अंतर्गत नादगाव तालुक्यातील सर्वात प्रथम घरकुल पुर्ण करण्याचा मान त्यांना मिळाला. घरकुलासोबतच मनरेगा मधून ९० दिवसाची मजूरी श्री. सोमनाथ हरि मेंगाळ यांना देण्यात आली. त्यामुळे ते अत्यंत समाधानी आहे.

नांदगाव पंचायत समितीचे गट विकास अधिकारी श्री. चौधरी यांनी श्री. सोमनाथ हरि मेंगाळ यांच्या घरकुलाला भेट त्यावेळी त्यांनी गट विकास अधिकारी यांना उन्हाळ्यात पिण्याचे पाणी मिळत नसल्याने त्यांच्या कुटूंबाचे हाल होत असल्याचे सांगितले. यावेळी गट विकास अधिकारी श्री. चौधरी यांनी घरकुलासह आजूबाजूच्या परिसराची पहाणी केली. त्यानुसार श्री. चौधरी यांनी **छत पाणी संकलन** करण्याच्या सल्ला व त्याबाबतचे मार्गदर्शन श्री. सोमनाथ हरि मेंगाळ यांना केले. त्यामुळे तुमच्या बोरवेलच्या पाण्याची पातळी वाढेल व उन्हाळ्यात तुमचा पाणी टंचाईचा प्रश्न मिटेल असे श्री. चौधरी यांनी सांगितले.

गट विकास अधिकारी श्री.चौधरी केलेल्या मार्गदर्शना प्रमाणे श्री. सोमनाथ हरि मेंगाळ यांनी पी. व्ही. सी. पाईप व इतर साहित्याची खरेदी करून छत पाणी संकलन तयार केले. याचा परिणाम त्यांना पहिल्याच पावसात जाणवला. त्यांच्या बोरवेलला पाणीच्या प्रमाण वाढले असल्याचे निदर्शनास आले. छत पाणी संकलनामुळे त्यांच्या पिण्याच्या व वापराच्या पाण्याचा प्रश्न कायम स्वरुपी मिटला आहे. बोरवेलची पाणी पातळी वाढल्याने श्री. सोमनाथ हरि मेंगाळ त्यांच्या शेतात भाजीपाल्या सारखी हंगामी पिके घेत आहे. त्य़ामुळे त्यांच्या आर्थिक परिस्थीतीत वाढ होवून त्यांचे जीवनमान उंचावले आहे.

महा आवास अभियानामुळे आज मला व माझ्या कुटूंबाला हक्काचे पक्के व सुरक्षित घरकुल मिळाले. तसेच माझा पिण्याचा पाण्याचा प्रश्नही कायमस्वरुपी मार्गी लागल्याने मी व माझे कुटूंब आनंदाने जगत आहे. याकरीता मी शासनाचा आभारी असल्याचे श्री. सोमनाथ हरि मेंगाळ यांनी सांगितले.





# खडतर परिस्थितीतून घरकुलाचे स्वप्न साकार

सांगली जिल्ह्यातील वाळवा तालुक्यामधील पश्चिमेला ६ ते ७ हजार लोकसंख्या असलेले कापूसखेड हे गाव आहे. गावामध्ये वारकरी सांप्रदायातील लोक जास्त असल्याने गावात मंदिरांची संख्या जास्त आहे. याच कापूसखेड गावातील श्री.नंदकुमार शिवाजी धुमाळे यांना सन १९-२० मध्ये रमाई आवास योजने अंतर्गत घरकुल मंजूर झाले होते. मंजूरीला एक वर्षापेक्षा जास्त कालावधी उलटूनही घरकुल बांधकामास सुरूवात न केल्याने वाळवा पंचायत समितीने प्रलंबित घरकुले असणाऱ्या लाभार्थ्यांना नोटीसा काढून पंचायत समिती कार्यालयात बोलवून घेतले. लाभार्थ्यांना घरकुल बांधकाम करण्यास होत असलेल्या विलंबाबाबत किंवा अद्याप पर्यंत घरकुल बांधकाम सुरु न करण्याबाबतची कारणे विचारली. श्री. नंदकुमार शिवाजी धुमाळे यांनी कोरोना काळात आलेल्या आर्थिक अडचण व रोजगार बंद असल्यामुळे घरकुल बांधण्यास विलंब झाल्याचे सांगितले. मला घरकुलाची नितांत गरज असून या सहा महिन्यात घरकुल बांधकाम पूर्ण करतो असे श्री. नंदकुमार शिवाजी धुमाळे यांनी सांगितले.

श्री. नंदकुमार शिवाजी धुमाळे लहान असतानाच त्यांच्या वडीलांचे निधन झाल्याने घराची सर्व जबाबदारी त्यांच्या आईवर आली. श्री. नंदकुमार शिवाजी धुमाळे यांनी आपले शिक्षण अर्धवट सोडून सूतगिरणी मध्ये कामाला सुरूवात केली. त्यांचे जुने घर दगड माती व कौलारू होते. पावसाळा आला की त्यांच्या घराला भिंतीना व जमीनी खाली पाझर फुटायची त्यामुळे ते पत्नी व लहान मुलांसह दुसऱ्याच्या घरात राहत असत. श्री. नंदकुमार शिवाजी धुमाळे यांच्या घरामध्ये दोन खोल्यापैकी एका खोलीत स्वंयपाक घर होते. घर दगड मातीचे असल्यामुळे तेथे सापाचे प्रमाण वाढू लागले स्वयपाक घरातील भिंतीना भेगा असल्यामुळे बऱ्याचदा घरात साप शिरत असत.



एकदा तर ६ ते ७ फुटाचा साप स्वंयपाक घरातील भिंतीमध्ये कौलामध्ये लपलेला, बऱ्याच वेळा त्याला मारण्याचा पकडण्याचा प्रयत्न केला पण घराच्या भिंती उंच व रुंद असल्यामुळे तो सापाचा शोध घेणे कठीण झाले. त्यामुळे बायको, मुली व माझ्या संपूण घरात भीतीचे व चिंतेचे वातावरण होते. श्री. नंदकुमार शिवाजी धुमाळे यांचे जुने घर हे राहण्यास अत्यंत असुरक्षित व धोकादायक होते.

ग्रामपंचायत व पंचायत समिती कार्यालयाचे अधिकारी/कर्मचारी यांचे सहकार्य व शासनाच्या रमाई आवास योजना यामुळे मी माझ्या स्वप्नातले घरकुल प्रत्यक्षात साकारण्यात यशस्वी झालो. आता पावसाळा व पावसाची भिती न बाळगता मी व माझे कुटुंब घरात मनात भिती न बाळगता शांत झोपू शकतो. आजपर्यंत जे वाईट दिवस मी अनुभवले तसे दिवस या घरकुलामुळे माझ्या मुलांच्या वाट्याला येणार नाहीत. माझ्या वाईट दिवसांमध्ये माझी पत्नी व आईने मला साथ दिली. मला खचू न देता खंबीरपणे माझ्या पाठीशी उभ्या राहिल्या. तसेच घरकुलासाठी बहीण व काही नातेवाईक यांनी आर्थिक मदत केली. त्यामुळेच माझे पक्क्या घराचे स्वप्न पूर्ण झाले. माझ्या घराच्या गृहप्रवेशाच्या वेळी माझ्या परिवारातील प्रत्येकाच्या डोळ्यात आनंदाश्रू होते.

श्री. नंदकुमार शिवाजी धुमाळे यांनी परिस्थितीशी हतबल न होता, खचून न जाता खंबीरपणे संकटाना धैर्याने तोंड दिले. आणि आपले घरकुलाचे स्वप्न साकार केले.



# आदिम आवास योजनेतून साकारली कातकरी कॉलनी

कातकरी महाराष्ट्रातील एक आदिवासी जमात लहान लहान टोळ्या करून रानात वस्त्या करून राहतात. पालघर जिल्ह्यातील जव्हार तालुक्यामध्ये रायतळे ग्रामपंचायती मधील अशाच कातकारी समाजातील गरजू, बेघर व भूमिहीन १९ लाभार्थांना घरकुलाकरीता जागा उपलब्ध करून कातकरी जमातीच्या लोकांचे स्थलांतर थांबवण्यासाठी एकाच ठिकाणी सर्व मुलभूत नागरी सुविधासह आदिम आवास योजना अंतर्गत कातकरी जमातीच्या १९ लाभार्थ्यांसाठी गृह संकुलांची निर्मिती करण्यात आली. या गृह संकुलाला **'आदिवासी हुतात्मा नाग्या कातकरी आदर्श घरकुल कॉलनी'** असे नाव देण्यात आले आहे.

रायतळे ग्रामपंचायती मधील आदिम आवास योजने अंतर्गत सन २०१७-२०१८ व २०१८-२०१९ मध्ये एकूण १९ लाभार्थी पात्र होते. परंतु सदर लाभार्थ्यांना घरकुल बांधण्यासाठी जागा नसल्याने त्यांना घरकुल मंजूरीला अडचण निर्माण झाली. या कातकरी समाजाला हक्काचे घरकुल देण्यासाठी व त्यांचे स्थलांतर थांबविण्याच्या हेतूने जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. सिध्दाराम सालीमठ व जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक श्री. तुषार माळी यांनी जिल्हाधिकारी श्री. माणिक गुरसुळ यांच्यासोबत समन्वय साधुन या लाभार्थ्यांना घरकुल बांधकामासाठी जागा उपलब्ध करून देण्यात आली.

जागा उपलब्ध झाल्यावर या कातकरी जमातीच्या १९ लाभार्थ्यांच्या घरकुलांना मंजूरी देण्यात आली. परंतु हे घरकुल लाभार्थी अत्यंत गरीब व आर्थिक दृष्ट्या दुर्बल असल्याने रू. १,२०,०००/- व मजूरीचे रू.१८,०००/- मध्ये सर्व जीवनाश्यक सुविधासह घरकुल बांधकाम त्यांना शक्य नव्हते. याकरीता स्थानिक पातळीवरील काम करणाऱ्या सामाजिक संस्थाची मदत घेण्याचे ठरले. त्यानुसार रोटरी जिल्हा ३१४१ या सामाजिक संस्थेने या १९ लाभार्थ्यांना मदत करण्याचे ठरविले. प्रकल्प संचालक, श्री. तुषार माळी यांनी रोटरी जिल्हा ३१४१ या संस्थेशी करार करण्यात आला. या करारामध्ये घरकुल निर्मिती करीता ग्रामीण गृहनिर्माण योजनेची रक्कम रू.१,२०,०००/- व्यतरीक्त प्रती घरकुल लाभार्थ्यास रक्कम रू. ७०,०००/- इतके अतिरीक्त अर्थसहाय्य उपलब्ध करून देण्याचे ठरले. रोटरी जिल्हा ३१४१ च्या माध्यमातुन मिळणारे रक्कम रू. ७०,०००/- प्रति लाभार्थी हे घरकुलासाठी रंगरंगोटी, प्लास्टर, किचन ओटा, फरशी बसविणे, लाईट इ. सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी वापरण्यात आले. त्यासोबतच रोटरी जिल्हा ३१४१ संस्थेने या कातकरी कॉलनीच्या जोड रस्त्याला सोलार लॅम्प व कातकरी कॉलनीमध्ये फरसबाग लावली आहे. लाभार्थ्यांच्या घरकुलांना पिण्याच्या पाण्यासाठी नळ जोडणी व गॅस जोडणी देण्याचे काम प्रगतीत आहे.

ग्रामपंचायतीमध्ये आदिम आवास योजने अंतर्गत घरकुल मिळण्यासाठी अर्ज होता. त्यानुसार ग्रामपंचायतीने घेतलेल्या ग्रामसभेत मला घरकुल पात्र यादीत नाव असल्याचे सांगितल्यावर मला खुप आनंद झाल्याचे श्री. विजय रमेश भोये यांनी सांगितले. माझे पुर्वीचे घर व नविन घरकुल बांधकामाची जागा यांचे फोटो काढण्यात आले. त्यानुसार मला आदिम आवास योजना सन २०१८-२०१९ या वर्षात घरकुल मंजूर करून बँक खात्याचा तपशिल व इतर सर्व कागदपत्रांची पुर्तता मी या आधिच केली असल्याने मला अनुदानाचा पहिला हप्ता घरकुल मंजूर झाल्याबरोबर लगेच मिळाला. त्यानंतर ग्रामीण गृहनिर्माण अभियंता, सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामसेवक, पंचायत समितीस्तरावरील अधीकारी यांनी वेळोवेळी घरकुल बांधकामास भेटी दिल्या. बांधकामाच्या टप्प्यानुसार घरकुलाचे सर्व हप्ते विनाविलंब मला मिळाले. त्यासोबतच मनरेगा मधून मजूरीची रक्कमही मिळाली. जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, पालघर व पंचायत समिती, तलासरी यांचे सहकार्य तसेच रोटरी जिल्हा ३१४१ या संस्थेचे रू.७००००/- अधिकचे अर्थसहाय्य मिळाल्याने माझ्या घराला प्लास्टर, रंग, किचन ओटा व फरशी इ. सुविधा करण्यास मोठी मदत झाली असल्याचे श्री. विजय रमेश भोये या घरकुल लाभार्थ्यांनी सांगितले.



# फोटो गॅलरी


डेमो हाऊस
पंचायत समिती-सेलू,
जिल्हा परिषद-वर्धा




प्रधान मंत्री आवास योजना ग्रामीण
डेमो हाऊस
पंचायत समिती, द.सोलापूर.


प्रधानमंत्री
आवास योजना-ग्रामीण
PRADHAN MANTRI AWAAS YOJANA-GRAMIN
डेमो हाऊस
पंचायत समिती पातूर जि.अकोला.


पंचायत समिती, पारशिवनी. (डेमो हाऊस)
प्रधान मंत्री
आवास योजना
Pradhan Mantri Awaas Yojana


डेमो हाऊस


महाराष्ट्र शासन
जिल्हा परिषद बुलडाणा
प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण
सन-2020-21 पं.स.शेगांव
डेमो हाऊस
कॉप शॉप


प्रधानमंत्री
आवास योजना ग्रामीण
डेमो हाऊस
सुस्वागतम्...!

## प्रधानमंत्री, मुख्यमंत्र्यांनी साधला लाभार्थ्यांशी संवाद

विविध योजनांची दिली माहिती

## Gondia glitters in *Awas Yojana*, tops State

■ District Correspondent
GONDIA, May 8

MAHARASHTRA Government is implemented 'Maha Awas Abhiyan' between November 20, 2020 and June 05, 2021 and to acknowledge the success of the schemes awards were announced recently 27 by the Rural Development Minister Hasan Mushrif. District Rural Development Authority (DRDA) of Gondia has won first prize in the State and was named as best in 17 different categories. Taking cognizance of this remarkable achievement, Gondia's Guardian Minister Prajakt Tanpure honoured Zilla Parishad CEO Anil Patil and all the concerned officials.

As per details, under the Pradhan Mantri Awaas Yojana for 2016-17 to 2020-21, of the targeted 82,334 *gharkuls* the district achieved 70,930 *gharkuls* giving a percentage of 86.15. It topped in the State.

Similarly in State awarded Ramai Awas Yojana had tareft of 7,718 *gharkuls* of which the Gondia district administration completed 6,260 *gharkuls* with a percentage of 80.52. In Shabri Awas Yojana, of the 1,835 targeted *gharkuls* the administration completed 1,513 at 85.43 percent. DRDA was the effective implementing agency.

Gondia has also set up Gharkul Mart which runs through selfhelp groups which makes building material available at cheaper rates for the beneficiaries.

Appreciating the achievement, Guardian Minister Prajakt Tanpure felicitated ZP CEO Anil Patil, Additional CEO Shital Pund, the then Project Director of DRDA Dinesh Harinkhede alongwith BDO Zhamsingh Tembhre, C C Harinkhede, Rohit Patle, Majid Bisen, Sarpanch Bhumeshwar Borkar (Tadgaon), Gramsewak Nilkant Madavi, Narendra Rahangdale, Dilip Khotele, Sangeta Agrawal, Rekha Pardhi, Dr Shrikant Waghaye, Martand Khune, S I Vaidya, Shalini Raut, Pramod Shahare, Sarpanch Ravishankar Pandhre (Adasi), Narendra Atkare, BDO Satish Lilhare, Anupkumar Bhave, Kalpana Malewar, Anil Admane, Sarpanch Sangeeta Nakade (Korambhi), Chandrashekar Halale, Sarpanch Nandkumar Gahane (Keshori), BDO Pundlik Kute, Umesh Kawale, M S Ukey, R K Bramhankar, Deepak Dhore, Y S Mendhe, Kishore Hatwar, Sachin Harinkhede, C S Chaudhari, Vanita Bhajipale, B G Rokde, Radheshyam Sable, Jitendra Sorle and others.

Extension Officer Vaishali Khobragade anchored the function. Collector Nayana Gunde, Superintendent of Police Vishwa Pansare and other dignitaries were also present on the occasion.


ZP CEO Anil Patil being honoured at the hands of Guardian Minister Prajakt Tanpure as Collector Nayana Gunde and SP Vishwa Pansare look on.

## नळजोडणीच्या कामासाठी सरपंचांचा सत्कार

प्रधानमंत्री, मुख्यमंत्र्यांनी साधला संवाद : पीएम किसानच्या ११ व्या हप्त्याचे वितरण

यांचा झाला सन्मान

एकत्रित प्रयत्नांची गरज : रामदास तडस

## पर्यावरणपूरक डेमो हाउसचे उद्घाटन

ग्रामीण विकास यंत्रणेकडून फ्रेम्ड स्ट्रक्चर व पर्यावरणपूरक बांधकामचा वापर

## स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव व महाआवास अभियान २ अंतर्गत समाधान शिबिर

## सण लोकशाहीचा, सर्वकष ग्रामविकासाचा...!

श्री. उद्धव बाळासाहेब ठाकरे, मा. मुख्यमंत्री | श्री. अजित पवार, मा. उपमुख्यमंत्री | श्री. बाळासाहेब थोरात, मा. मंत्री, महसूल | श्री. हसन मुश्रीफ, मा. मंत्री, ग्रामविकास | श्री. अब्दुल सत्तार, मा. राज्यमंत्री, ग्रामविकास

## महाआवास अभियाना अंतर्गत कुरूड येथे घरकुलांचे भूमिपूजन व प्रगती आढावा

■ देसाईगंज पंचायत समितीचा उपक्रम

## घरकुलांची कामे तात्काळ मार्गी लावा - सीईओ

महाआवास अभियानातील कामांचा घेतला आढावा

## डेमो हाऊसमुळे घरकुलाच्या बांधकामाकरिता मिळणार दिशा


डेमो हाऊसचे लोकार्पण करताना आ. डॉ. पंकज भोयर व उपस्थित मुडे, तलवारे, पडघम, मलमे, चौधरी, राठोड आदी.

लोकमत न्यूज नेटवर्क

**वर्धा :** निसर्गाचा सहवास ग्रामीण भागातील परिवाराला शासन घरकुल योजनेचा लाभ देते. ते घरकुल कसे असावे, यासाठी पंचायत समिती आवारात डेमो हाऊस बांधण्यात आले आहे. त्याचे लोकार्पण आमदार पंकज भोयर यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी माजी सभापती अशोक मुडे, माजी उपसभापती नरेश तलवारे, गटविकास अधिकारी एस. पी. पडघम, पंचायत समितीचे अभियंता मलमे, गौरव चौधरी, विस्तार अधिकारी यू. डी. चव्हाण, आर. बी. राठोड, आदी उपस्थित होते. शासन ग्रामीण भागातील नागरिकांना प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत घर बांधकामासाठी निधी देते. त्या अंतर्गत अनेक गरजू परिवारांना आपल्या हक्काचे घर मिळत आहे. संबंधित घरकुल लाभार्थ्यांनी पंचायत समिती कार्यालय परिसरात बांधलेल्या डेमो हाऊसचे अवलोकन केल्यास ते घर बांधकाम करण्यासाठी उपयुक्त ठरू शकते, असे आमदार पंकज भोयर यांनी सांगितले. ग्रामपंचायतीमध्ये डेमो हाऊसची प्रतिकृती ठेवण्यात आली असून, त्यानुसार बांधकाम करावे, असे सांगण्यात आले. यावेळी सरपंच सचिन सोमनाथे, जयश्री धोटे, संदीप वाणी, टाकळीचे उपसरपंच संकेत बारई, ग्रामविकास अधिकारी व ग्रामसेवक उपस्थित होते.

## घरकुलाचा पहिला हप्ता उचलून कामे न करणाऱ्या लाभार्थ्यांवर कारवाई करणार-सिईओ वर्षा ठाकूर



नांदेड/प्रतिनिधी-नांदेड जिल्ह्यात घरकुलाचा पहिला हप्ता उचलून काम न करणाऱ्या लाभार्थ्यांवर वसुलीसाठी कायदेशीर कारवाई करण्याची प्रक्रिया लवकरच सुरु करण्यात येईल, अशी माहिती जि.प. च्या प्रशासक तथा सिईओ वर्षा ठाकूर-घुगे यांनी पत्रकारांशी बोलतांना दिली आहे.

पंतप्रधान आवास घरकुल योजने अंतर्गत नांदेड जिल्ह्यातील १४ हजार लाभार्थ्यांनी घरकुलाच्या बांधकामासाठी पहिला हप्ता उचलला आहे. परंतु घरकुलाचे काम केले नाहीत. अशा २०१५ ते १६ पासून लाभार्थ्यांचे नावे ग्रामपंचायतीच्या नोटीस बोर्डावर लावले जाणार आहेत. पहिला हप्ता उचलणाऱ्या लाभार्थ्याकडून वसुलीसाठी विशेष मोहिम लवकरच सुरु करून त्यांच्या विरुध्द कारवाई करण्यात येईल. नांदेड जिल्ह्यात २३ हजार घरकुल मंजूर झालेले आहे. त्यापैकी ५६ टक्के घरकुलांचे काम प्रगतीपथावर झाले असून लाभार्थ्यांना दुसरा व तिसरा हप्ताही मिळालेला आहे, असे सिईओ वर्षा ठाकूर यांनी सांगितले. पालकमंत्री ना.अशोक चव्हाण यांनी जिल्हा नियोजन मंडळाच्या निधीतून ५ कोटी रुपये गाव तिथे स्मशानभूमी या उपक्रमासाठी दिले आहेत. ज्या गावात स्मशानभूमी नाही तिथे गायरान किंवा खाजगी जागा संपादीत करुन स्मशानभूमी तयार केली आहे. अजुन ७० गावातील स्मशानभूमीचे प्रस्ताव आलेले आहेत. जिल्हा परिषदेत अनुकंपाधारकांची यादी प्रलंबित होती. दीड वर्षात १०३ अनुकंपाधारकांना नियुक्ती देवून जि.प.च्या सेवेत रुजू करुन घेतले आहे. जि.प.च्या वतीने शाळापूर्व तयारी सुरु करण्यात आली असून विद्यार्थ्यांच्या मनात शिक्षणाची रुची निर्माण व्हावी यासाठी प्रशासन विविध उपक्रम राबविणार आहे. नांदेड जिल्ह्यात शिक्षण विस्तार अधिकारी, गटविकास अधिकारी व अन्य काही पदांच्या रिक्त जागा आहेत. या जागा भरण्यासाठी शासनाकडे पाठपुरावा सुरु आहे. कोरोनाची चौथी लाट सुरु झाल्याचे संकेत मिळत असून राज्यात कोरोना रुग्ण संख्या वाढत चालली आहे. जि.प.च्या आरोग्य विभागानेही ग्रामीण भागात लसीकरणाच्या मोहिमेचा वेग वाढविला आहे. खरीप हंगामात शेतकऱ्यांना खत व बियाणांची टंचाई भासू नये. तसेच बनावट बियाणांना आळा घालण्यासाठी कृषी विभागाकडून उपाययोजना सुरु आहेत. प्रत्येक तालुक्याला कृषी विभागाकडून भरारी पथकांची नियुक्ती करण्यात आली असून बनावट बियाणे विक्री करणाऱ्या व्यापाऱ्यां विरुध्द गुन्हे दाखल करण्यात येतील, असा इशाराही सिईओ वर्षा ठाकूर-घुगे यांनी दिला. यावेळी जि.प.चे अतिरिक्त सिईओ डॉ.तुबाकुल्ले, उपमुख्य कार्यकारी अधिकारी सुधीर ठोंबरे, नामदेव केंद्रे यांच्यासह जि.प.चे अधिकारी उपस्थित होते.

## डेमो घरकुलाची राज्य शासनाकडून दखल

लोकमत न्यूज नेटवर्क

**पाथरी:** प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत कमी पैशात दर्जेदार घरकुल कसे बांधावे, यासाठी तयार करण्यात आलेल्या पाथरी येथील डेमो घरकुलाची राज्य शासनाने दखल घेतली आहे. शासनाकडून तयार करण्यात आलेल्या मासिकेच्या पहिल्या पानावर पाथरी येथील डेमो घरकुलाचा फोटो प्रकाशित करण्यात आला आहे.

स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव कार्यक्रमादरम्यान महाआवास योजना राबवत असताना पाथरी पंचायत समितीचे शाखा अभियंता पी. डी. पाटील यांच्या तांत्रिक संकल्पनेतून २ लाख १५ हजारांत डेमो घरकुलाची उभारणी करण्यात आली आहे. त्यामुळे हा डेमोचा पाथरी पॅटर्न राज्यात राबविण्याच्या हेतूने राज्याच्या महाआवास त्रैमासिकाचे प्रकाशन करताना मासिकाच्या मुखपृष्ठावर पाथरी डेमोला स्थान मिळाले आहे. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत महाआवास त्रैमासिकाचे प्रकाशन नुकतेच झाले. त्यावर पाथरी येथील डेमो घरकुलाचा फोटो प्रकाशित झाला आहे.

दरम्यान, पाथरी पंचायत समितीच्या परिसरात तयार करण्यात आलेल्या डेमो घरकुल बांधकामासाठी राज्य शासनाने २ लाख १५ हजार रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला होता. या निधीतून हे डेमो घरकुल बांधण्यात आले आहे.

राज्य शासनाने दखल घेतलेले पाथरी येथील डेमो घरकुल.

## पाच वर्षांनंतर यावलमध्ये मिळणार सर्वाधिक १,१६२ घरकुलांचा लाभ

हक्काचे घर • ४१८ लाभार्थींना पहिला हप्ता वितरित, चार टप्प्यात मिळेल रक्कम

## सामाजिक दायित्व निधीतून महाआवास मूल्यवर्धन

सीएसआर प्रमुखांची बैठक : व्हीएसटीएफच्या माध्यमातून जि. प. मध्ये संवाद

माहिती देताना विद्या पाल व उपस्थित विविध कंपन्यांचे प्रतिनिधी.

### उत्कृष्ट कार्य करणाऱ्यांचा सन्मान

महाआवास अभियान ग्रामीण २०२१-२२ कालावधीत उत्कृष्ट कार्य करणाऱ्या संस्था व व्यक्तींना महाआवास अभियान पुरस्कार २०२१-२२ देऊन गौरविण्यात येणार आहे. समाजातील सर्व घटकांनी सहभाग नोंदविल्यास उत्कृष्ट कार्याचा सर्वोत्कृष्ट घरकुल, ग्रामपंचायत, तालुका व सर्वोत्कृष्ट जिल्हा म्हणून सत्कार होणार आहे.

### महाआवास अभियानाची उद्दिष्टे

## एक दिवस घरकुलासाठी अभियान

गावोगावच्या सर्व लाभार्थ्यांच्या अडीअडचणी घेतल्या समजून


घरकुलांची पाहणी करताना गटविकास अधिकारी सुधीर भागवत

लोकमत न्यूज नेटवर्क

**वडगाव मावळ :** पावसाळ्यापूर्वी घरकुलांची कामे मार्गी लागावीत, यासाठी मावळ पंचायत समितीच्या वतीने 'एक दिवस घरकुलासाठी' उपक्रम राबवून गावोगावच्या लाभार्थ्यांच्या अडीअडचणी समजून घेतल्या. अर्धवट राहिलेली कामे युद्धपातळीवर करा, अशा सूचना गटविकास अधिकारी सुधीर भागवत यांनी अधिकाऱ्यांना दिल्या.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व प्रकल्प संचालक यांच्या मार्गदर्शनानुसार गटविकास अधिकारी सुधीर भागवत यांच्या संकल्पनेतून तालुक्यात 'एक दिवस घरकुलासाठी' हा उपक्रम राबविण्यात आला.

मावळ तालुक्यात प्रधानमंत्री, रमाई, शबरी, अटल बांधकाम योजनेअंतर्गत पहिला हप्ता घेऊन सुरू केलेली घरकुले, भूमिहीन लाभार्थी, तीन महिन्यांचा कालावधी होऊनही अद्याप घरकुलांचे बांधकाम सुरू न केलेले लाभार्थी, पात्र परंतु स्वतःची जागा नसलेले लाभार्थी अशा सर्वांच्या समस्यांचे निराकरण करण्याचे नियोजन पालक, अधिकारी व संपर्क अधिकारी यांच्यामार्फत करण्यात आले होते.

गटविकास अधिकारी सुधीर भागवत यांनी पवन मावळील कडधे व येळसे येथे, साहाय्यक गटविकास अधिकारी प्रताप पाटील यांनी आंदरमावळातील वडेश्वर येथे गृहभेटी देऊन घरकुलांची पाहणी केली. यावेळी लाभार्थ्यांच्या अडचणी समजून घेतल्या व याबाबत माहिती दिली.

## सिंदेवाही तालुक्यात राणी हिराई घरकुल मार्ट सुरू

## अनेकांच्या आशियानाची स्वप्नपूर्ती

## अठरा विश्व दारिद्र्यावर मात करीत आदिवासींनी साकारले घरकूल

'रो हाउस'ला लाजवेल अशी घरकुले, जिल्ह्यात आदर्श ठरावे अशी कामगिरी

## जिल्ह्यात सहा वर्षांत 35 हजार लाभार्थ्यांना मिळाला निवाऱ्याचा लाभ

## रमाई आवास योजना: बुलडाणा जिल्हा राज्यात अव्वल

तीन हजार दोनशे घरे मंजूर तर एक हजार लाभार्थ्यांना प्रथम हप्ता वितरीत

## शासनाने ठरवून दिलेल्या डेमोनुसारच घरकुल बांधण्याचे आदेश

प्रत्येक ग्रामपंचायतीला केले डेमोचे वितरण

## आज पं.स.स्तरावर घरकुल मेळावा

लोकमत न्यूज नेटवर्क

**परभणी :** प्रधानमंत्री आवास योजनेचा लाभ विनाविलंब मिळावा, यासाठी २ जून रोजी प्रत्येक पंचायत समितीस्तरावर मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

जि.प. मुख्य कार्यकारी अधिकारी शिवानंद टाकसाळे यांच्या संकल्पनेतून प्रपत्र ड आवास प्लस प्राधान्यक्रम यादीतील लाभार्थ्यांना घरकुलांची मंजुरी देण्यासाठी हे मेळावे घेतले जाणार आहेत. तालुकास्तरावर होणाऱ्या मेळाव्यामध्ये लाभार्थ्यांकडून ऑनलाइन रजिस्ट्रेशन करण्यासाठी बँक पासबुक, आधार कार्ड, मोबाइल क्रमांक आदी कागदपत्रे जमा केली जाणार आहेत. लाभार्थ्यांनी उपस्थित रहावे, असे आवाहन करण्यात आले.

## घर उभारण्यासाठी आता बचत गट सज्ज, ताईंच्या पुढाकारानं घरकुल होणार स्मार्ट

काय मिळते घरकुल मार्टमध्ये

## अवघ्या २१ दिवसातच घरकुलाचे बांधकाम पूर्ण!

तांड्यातील लाभार्थ्याने आदर्श उभारला

लोकमत न्यूज नेटवर्क

**अमळनेर :** एकीकडे अनुदानाचा दुसरा हप्ता मिळूनही घरकूल बांधकाम न करणारे अनेक जण आहेत. अमळनेर तालुक्यात ही संख्या जवळपास २ हजारांच्या आसपास आहे. या लाभार्थींनी घरकूलच बांधले नसल्याचे आढळून आले आहे, तर दुसरीकडे लोणचारम तांडा (ता. अमळनेर) येथील नरसिंग चव्हाण या लाभार्थीने चक्क २१ दिवसांत घरकूल पूर्ण करीत अधिकाऱ्यांनाही आश्चर्याचा धक्का दिला.

तालुक्यात २०१६ - १७ पासून विविध घरकूल योजनांमध्ये २ हजार ७१ घरकूल अपूर्ण आहेत. लाभार्थींनी

### नरसिंग यांचा सत्कार

लोणचारम तांडा येथील नरसिंग भावसिंग चव्हाण या लाभार्थीने २१ दिवसांत घरकुलाचे बांधकाम पूर्ण केले. याबद्दल गटविकास अधिकारी एकनाथ चौधरी यांनी त्यांना बोलावून घेतले आणि आपल्या दालनात त्याचा सत्कार केला. यावेळी विस्तार अधिकारी एल. डी. चिंचोरे, सरपंच, ग्रामसेवक व ग्रामरोजगार सेवक उपस्थित होते.

अनुदानाचे पैसे घेतले; पण घरकूल बांधलेले नाही. घरकूल न बांधणाऱ्या लाभार्थींवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याच्या नोटिसा दिल्या जात आहेत.

## 'घरकुल'च्या लाभार्थ्यांची म्हैसाळमध्ये आढावा बैठक

## घरांसाठी मिळेना जागा

सर्वसामान्यांचे स्वप्न अधुरेच : साडेतीन हजारांवर लाभार्थी प्रतीक्षेत

## इंदापुरात घरकुलांचे स्वप्न पूर्ण होणार

नवीन घरकुलांसाठी परिपूर्ण प्रस्ताव सादर करा -विजयकुमार परीट

## चोरटी येथे उमेदचे वार्षिक अधिवेशन व घरकुल मार्टचे उदघाटन

## भिकार सांगवीत प्रधानमंत्री आवास योजनेचा शुभारंभ

## बारामतीतील २६२ जणांचे घराचे स्वप्न झाले पूर्ण

'एक दिवस घरकुल लाभार्थीसाठी'च्या मोहिमेचे यश



स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव अंतर्गत मा. प्रधानमंत्री यांचे गरीब कल्याण सम्मेलन व मा. मुख्यमंत्री यांचा लाभार्थी संवाद कार्यक्रमा प्रसंगी मा.केद्रीय राज्यमंत्री, वित्त, भारत सरकार, डॉ.भागवत कराड दूरदृष्य प्रमाणीव्दारे औरंगाबाद येथे उपस्थित




स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव अंतर्गत मा. प्रधानमंत्री यांचे गरीब कल्याण सम्मेलन व मा. मुख्यमंत्री यांचा लाभार्थी संवाद कार्यक्रमा प्रसंगी प्रास्ताविक सादर करतांना मा.अतिरिक्त मुख्य सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग, श्री.राजेश कुमार




स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव अंतर्गत मा. प्रधानमंत्री यांचे गरीब कल्याण सम्मेलन व मा. मुख्यमंत्री यांचा लाभार्थी संवाद कार्यक्रमा प्रसंगी विविध केंद्र व राज्य पुरस्कृत योजनांच्या लाभार्थ्यांचा सत्कार करतांना मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, श्री.उद्धव ठाकरे



स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव अंतर्गत मा. प्रधानमंत्री यांचे गरीब कल्याण सम्मेलन व मा. मुख्यमंत्री यांचा लाभार्थी संवाद कार्यक्रमा प्रसंगी उपस्थित मान्यवर

"महाराष्ट्र शासनाचा एकच ध्यास,
२०२४ पर्यंत सर्वांसाठी आवास"




**संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष - ग्रामीण गृहनिर्माण यांचे कार्यालय**

४ था मजला, दक्षिण कक्ष, सिडको भवन, सी. बी. डी. बेलापूर, नवी मुंबई - ४००६१४

Email ID : directoriayruralhousing@gmail.com

दुरध्वनी क्र. : ०२२-२७५६१८२४